# व सु न्ध रा

९५५८
.ा. ग्रं. सं. ठाणें
.य ३०८५
क्र. १४२२

प्रताप

REFBK-0010092
REFBK-0010092

चित्रशाळा प्रकाशन, पुणें २


वसुंधरा
प्रताप

# वसुन्धरा

प्रताप

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळमत.
अनुक्रम २४९९३ वि: ३/८४
क्रमांक १४२२ नों: दि: २९।१९५५

REFBK-0010092
REFBK-0010092

चित्रशाळा प्रकाशन : पुणें २

मुद्रक व प्रकाशक :
**दा. त्र्यं. जोशी** बी. ए. ( टिळक ),
व्यवस्थापक, चित्रशाळा प्रेस,
१०२६ सदाशिव, पुणें २.

❀ ❀ ❀

(१०००)
प्रथमावृत्ति : ऑगस्ट १९५८
किंमत दोन रुपये

❀ ❀ ❀

आवृत्ति पहिली जून १९५८
सर्व हक्क : सौ. कृष्णाताई गोपाल जमदाडे
यांचे स्वाधीन

अनुक्रम ...... वि: ......
क्रमांक ...... नों: दि: ......

# मृगाचे शिंतोडे

जीवनांतील सौंदर्याचा आविष्कार करतांना जगांतील थोर थोर कवींनीं निरनिराळ्या मार्गांचा अवलंब केलेला आहे. त्यांत व्यास, वाल्मीकि, भवभूति, कालिदास, शेक्सपीअर, गटे आदि कवींचे मार्गच सर्वश्रेष्ठ व आदर्श ठरले आहेत. नुसता कालिदास कवि घेतला तरी त्याच्या मेघदूत' काव्यानें सौंदर्याचा ठाव घेतांना मानवी भावनांची अत्युच्च पातळी गांठली आहे. अशा रीतीनें अमर काव्य, अतुल्य कला व अढळ सौंदर्य यांचे आदर्श अनादि कालापासून मानवापुढें ठेवले गेले आहेत. अशा स्थितींत सौंदर्याची व त्याच्या आविष्काराची नवी व्याख्या करण्याची आवश्यकता नाहीं. पण मानवी मन मधून मधून उन्मेष पावतें, तसेंच बुरसतें आणि त्याच्या आवडी-निवडीची पातळी वर खालीं जाते; आणि मग विकृत मनःस्थितींत हत्तीचें वर्णन करणाऱ्या चार आंधळ्यांप्रमाणें तें वेगवेगळ्या परिस्थितींत वेगवेगळ्या वस्तूंना सौंदर्य समजतें. परंतु सत्याला म्हणजेच सौंदर्याला पाठपोट नसतें; तें एकरूप असतें व त्याचें स्वरूप अढळ, अमर व अक्षर असतें. त्याच्यापर्यंत पोंचण्यास सरळ व योग्य मार्ग ज्यास सांपडतो त्यालाच त्याचा साक्षात्कार होतो व तोच त्याचा यथार्थ आविष्कार करूं शकतो. कलेचा जन्महि अशाच ठिकाणीं होतो.

मधून मधून 'जुनें नवें' असा वाद निघाला तरी सौंदर्यांत जुनें नवें कांहीं नसतें. कला ही उर्वशीप्रमाणें चिरतरुण व चिरसुंदर असते. 'जुने नवे' असे वाद म्हणजे मानवी मनाला जडलेल्या क्षणिक विकृतीचा आविष्कार असतो व तो क्षणजीवीच असतो.

आजकालच्या कवितेंत हे दोन पंथ निश्चित आहेत. कविता म्हणजे बुद्धि, कविता म्हणजे केवळ वैचारिक ओळ, कविता म्हणजे मानवतास्पर्शविरहित कल्पना, कविता म्हणजे साक्षात् दुर्बोधता, कविता म्हणजे हरएक बाबतींत स्वैरता, असें म्हणणारा एक वर्ग आहे; व केवळ सौंदर्यानुभूतीचा भावपूर्ण आस्वाद घेऊन त्यांतील मानवी भावना हृदयस्पर्शी भाषेंत व्यक्त करणारा दुसरा एक वर्ग आहे. वास्तविक दोघेहि सौंदर्याचेच उपासक; पण भूमिका

निराळ्या व मार्गशोधन निराळें झाल्यामुळें आरंभींचा दृष्टिकोण पुढें रुंदावत गेला व त्यामुळें त्यांच्या गणिताचीं उत्तरें निराळीं आलीं.

श्री. प्रताप कवि हे या दुसऱ्या वर्गापैकीं कवि आहेत. मधून मधून एखाद्या वेळीं आपला काव्यविषय निवडतांना ते नको त्या क्षेत्रांत शिरतात व विनोदाचा मोह त्यांना आवरत नाहीं. पण त्यांचें मन त्यांत सर्वस्वीं रमलेलें दिसत नाहीं. घटकाभर कुचाळी केली, तरी रससिद्ध किंवा रसभरित बोलणें हें वेगळें असतें व त्याच्या वेळा व जागा वेगळ्या असतात, हें ते जाणतात. त्या कोणत्या याचा ' वसुंधरेंत ' शोध घेणें अगत्याचें आहे.

श्री. प्रताप हे बरींच वर्षें कविता लिहीत आहेत. महाराष्ट्रांतील कृष्णेच्या परिसरांत व सह्याद्रीच्या आवर्ती भोंवतीं त्यांचें मन व अंत:करण एकसारखें वावरत असल्यानें, त्यांच्या मनाला झालेले संस्कार बहुविध व अभिजात आहेत. त्यांना कविता आवडते त्याचें कारण तिला उद्देशून ते म्हणतात—

" सहवासीं येइ तुझ्या कल्पवृक्ष फलाफुलां "

व शिवाय तिच्या सहवासांत त्यांना " कळ्या कळ्यांतुन जीवन फुललें "लें दिसतें. त्यांना नवीन युगाचा साम्यवाद हवा आहे व त्याबद्दल—

" गरिबापोटीं स्वतंत्र वारा जाइल का बोला ! "

असा ते मोठ्या उत्कटतेनें तळमळून प्रश्न करतात.

ते स्वातंत्र्याचे भोक्ते असले तरी

" बनूं नका बलि कलिकालाचे ! "

असा ते स्वैरतेविरुद्ध इशारा देतात. क्वचित् समाजांतील अघोरी राजकारण, स्वार्थी प्रेरणा किंवा पोटभरूपणा पाहिला कीं ते त्यांचा विनोदानें समाचार घेतात, किंवा स्त्री-जातीच्या दु:खावर ' शकुंतला ' सारखी जिव्हाळ्याची कविता लिहून,

" पाहुं किती तव वाट, नृपाळा !
स्त्रीजाती का रे पाचोळा ? "

असा ते, नेमकें बोट ठेवून प्रश्न विचारतात. क्वचित् आपल्या पाडसाची याद येऊन, त्यांच्या वाणींतून वात्सल्य उमळतें व मग ते—

" शेजारच्या बाळा छातीशीं घेतलें ! "

असा समाधानाचा सुसकारा सोडतात. परंतु कृष्णेच्या पाण्यांतून व सह्याद्रीच्या खडकामातींतून झालेल्या संस्काराच्या या खऱ्या नसा नव्हेत. त्यांत ते मधून मधून प्रवेश करतात. पण त्यांचें अंत:करण खरोखरी रमतें तें "जीवन व निसर्ग" आणि "प्रीति" या दोन विषयांत.

निसर्गाच्या बाबतींत तर त्यांनीं 'वसुंधरा' या नांवापासूनच आनंद घेण्यास सुरुवात केली आहे. जीवनाबद्दल श्री. प्रताप यांना विलक्षण पोटतिडिक आहे. आपलें व आपल्या भोंवतालचें सामाजिक जीवन ते सूक्ष्मतेनें न्याहाळून पाहतात व मनांतील ध्येयवादाच्या दृष्टीनें त्यांतील उणीवांचें चित्रण करतात. कधीं कधीं ते 'वसुंधरे!' किंवा 'चांदणें' या सारख्या कवितांतून आपला ध्येयवाद चित्रित करतात. या ध्येयवादांत जीवन व निसर्ग एक झालेलीं दिसतात. या विषयावर त्यांनीं एकूण १६ कविता लिहिल्या असून, त्यांत त्यांनीं आपलें जीवनाबद्दलचें व निसर्गाबद्दलचें प्रेम व्यक्त केलें आहे. जीवनाबद्दल आजकाल उदासीन असण्याच्या किंवा वैफल्यवादी बनण्याच्या काळांत या कवितांचें महत्त्व विशेष आहे. जीवनाला प्रेरणा निसर्गातून मिळते, हें लक्षांत असल्यामुळें त्यांचा ओढा निसर्गाकडे आहे. त्यांना आईची मिठी, पत्नीची मिठी व काळाची मिठी यांतील गांभीर्य व रहस्य समजतें. 'दैवत माझें मायमाउली' हें त्यांना पूर्ण कळतें व वळतें. आपल्या जीवनाचे आपणच शिलेदार आहों हें तत्त्व त्यांच्या रक्तांत खेळतांना दिसतें. 'मृत्यूनंतर ज्याच्यासाठीं मागें रडावयास कोणी नाहीं' अशाबद्दल त्यांना अतीव करुणा वाटते; आणि जीवनाच्या दारुण निराशेतून त्यांचें मन आशेचा मागोवा घेत फिरत जातें.

निसर्गातील स्वाभाविक सौंदर्य शोधण्यासाठीं त्यांच्या मनाचा मुक्त विहंग सदैव वरच्या वातावरणांत फिरत असतो. या स्वैर फिरण्याचें त्याला वेड आहे व त्यांतच त्याला गोडी आहे. त्याबद्दल त्याला कुणी 'वेडें' म्हटलें तरी त्याची त्याला पर्वा वाटत नाहीं. वसुंधरेचे नवे नवे उन्मेष पाहून त्याचा जीव भारून जातो. नाविन्याचें रूप चराचर वसुंधरेच्या आधारानेंच खुलतें अशी त्याला मनोमन साक्ष पटते; आणि त्याच्या जिवाचा जेव्हां दाह होतो, तेव्हां शांतीसाठीं तो कृष्णामाईकडे धाव घेतो आणि मग त्याच्या मनांतील वादळ संपूर्ण शांत होतें. तुफान वाऱ्यामध्यें त्याला जुलमी तापानें

खवळलेली निसर्गाची उग्र मुद्रा दिसते, चैत्रामध्यें पाऊस आला, कीं धुळीच्या मस्त सुगंधांतून चैत्रपालवीचे कोंब बाहेर येतांना त्याला दिसतात व मग जणुं कांहीं तो

“ चैतन्यानें जणू तयाच्या
चैत्रपालवी फुटे जिण्याला ! ”

असे सुंदर शब्द उद्‌गारूं लागतो; ‘ टिपूर चांदणें ’ पडलेलें पाहून त्याचें मन हलकें फूल होऊन वर जातें व त्याच्या डोळयांपुढें नाना प्रकारचे रंग व तरंग उठून आपण कुठल्या तरी जरतारी स्वप्नभूमींत वावरतों आहोत, असें त्याला वाटतें. श्री. प्रताप कवींचा मनोविहंग असा आहे.

पण निसर्गापेक्षांहि त्यांच्या मनाला सर्वस्वीं आकर्षून घेणारा विषय म्हणजे ‘ प्रीति ’ हा होय. ‘ वसुंधरेंत ’ सर्वांत अधिक कविता या विषयावरील आहेत. म्हणून श्री. प्रताप यांच्या व्यक्तित्वाचा गाभा ‘ प्रीति ’ हा आहे, असें मी म्हणतों. त्यांनीं प्रीतीचीं चित्रें रंगवितांना तिचें अन्योन्य स्वरूप व्यक्त केलें आहे. त्यांचे नायक कधीं प्रीतीला प्रणयपांखरूं संबोधून काव्याचें कौतुक करणारीचें कौतुक करतात, तर कधीं आपल्यावर ‘ तांदूळ पडले ’ आहेत याची जाणीव आपल्या प्रेयसीला देतात; कधीं वर्षर्तूच्या धारा व प्रेमाश्रू आपल्या हृदयाच्या शिंपल्यांत मोती बनवितील असें त्यांस वाटतें, तर कधींभाव फुलांचा अमोल ठेवा हृदयींचा हृदयांतच ठेवून देतात; कधीं आपल्या घरीं सखीचीं कंकणें किणकिणलीं कीं तें ‘मुकें बोलणेंच’ झालेसें त्यांस वाटून जीवनांत साफल्य लाभलेसें वाटतें, तर कधीं त्यांना जीवनाची प्रीतजुई फुलविण्यासाठीं तिला आवाहन करावेंसें वाटतें; कधीं प्रेयसीच्या गांवावरून जातांना त्यांचें मन भारावतें, तर कधीं त्यांचें हळवें मन “युगें युगें मी वाटच पाहिन ! प्रीतिराउळीं दीप तेवावित ” अशी प्रीतीची भलावणी करतें. कधीं एखाद्या वेळीं अधिक्षिप्त प्रीतीचें चित्रहि ते रंगवितात, तर कधी प्रीतीचा आशय कवितेंत व्यक्त केल्यावर त्यांना ‘ भावमालिका झाली अक्षर ’ असें वाटतें. कधीं अज्ञाताच्या गूढ तमांत प्रीतीची विद्युल्लता चमकेल अशी त्यांना आशा वाटते, तर कधी प्रीतीचें नाटक संपून शेवटचा पडदा पडला असेंहि वाटतें. इतकेंच काय पण प्रेयसीला आपल्या विफल प्रीतीबद्दल काय

चाटत असेल याचींहि विविध चित्रें ते रंगवितात. या प्रेयसीला आपल्या साथीदाराची वाट पाहतांना "चंदेरी किरणांची रापण झरली जणुं बरसात !" असें किंवा

"फुलें उमललीं वेलीवरलीं सुगंध सुटला दाट !"

असें स्वप्नभूमीवरील रम्यकोमल चित्र दिसतें. कधीं कधीं तिला प्रीतीचे खेळ खेळलेल्या 'नाना खुणा' दिसतात व त्यांचें स्मरण होऊन ती व्यथित होतांना दिसते. सारांश, प्रीतीच्या क्षेत्रांत आलेले विविध अनुभव व त्याचे आशय आपल्या भाव-कवितांतून ते तन्मयतेनें व्यक्त करतात. त्यांच्या प्रीतिचित्रणांत प्रामाणिकता व विविधता आहे, पण सूक्ष्मता नाहीं. गोविंदाग्रज, तांबे, माधव जूलियन्, यशवंत किंवा अनिल यांच्यामधील कलात्मक सूक्ष्म भाव या कवितांत नाहीं, हें थोडें फार जाणवतें. तथापि त्यांची प्रीतीची भावना हीच सर्व प्रभावी आहे, असें म्हणावेंसें वाटतें. तोच त्यांचा स्थायी भाव आहे.

श्री. प्रताप कवि हे कधीं कधीं कवितेची 'डागडुजी' नीट करीत नाहींत, असें कांहीं कवितांवरून वाटतें. शब्दांची निवड, वाक्यांची बांधणी, छंदांचें आंदोलन या गोष्टी सहज न झाल्या, कीं त्यांनीं सौंदर्य उणावतेंच; पण अशीं स्थळें थोडीं आहेत. पहिल्या पहिल्या कांहीं कविता सोडल्या तर पुढील कवितांत हे दोष दिसून येत नाहींत.

ही वसुंधरेची वेल आतां फुलोरलेली असून तिच्या कळ्याफुलांतून भरलेल्या जीवनाचा सुगंध दरवळत आहे. त्यांच्याच आवडत्या कल्पनेंत म्हणावयाचें म्हणजे माझ्या टीकेच्या चार शिंतोड्यांनीं वसुंधरेंतील सुगंध दरवळेल व भोंवतालच्या लोकांना त्यानें समाधान वाटून वर्षाकाळ जवळ आल्याचा आनंद होईल.

४ मे १९५८<br>
जलमंदिर, फलटण.

गिरीश

## तपानंतर—

नये नेत्रीं जळ नाहीं अंतरीं तळमळ
तों हे चावटीचे बोल तुका म्हणे सारें फोल

—तुकाराम.

माझ्या स्फुट कवितांचा ‘ वसुन्धरा ’ हा संग्रह मराठी वाचकांना सादर करतांना मला अत्यंत आनंद वाटतो. गेल्या तपांत निरानिराळ्या मासिकांतून माझ्या ज्या कविता प्रसिद्ध झाल्या, त्यांपैकीं कांहीं कविता या संग्रहांत समाविष्ट करण्यांत आल्या आहेत. १९५४ सालीं ‘ सुगन्ध-वारा ’ हें खंडकाव्य मीं प्रसिद्ध केलें. श्रेष्ठ साहित्यिकांपासून तों सामान्य वाचकांपर्यंत त्याचें जें कौतुक झालें त्या प्रेरणेमधून तीन वर्षांनंतर हा संग्रह प्रसिद्ध होतांना आत्मविश्वासानें व यशानें माझें मन मोहरून गेलें आहे.

माझ्या सर्वच कविता मला मनापासून आवडतात. तसें पाहिलें तर माझें जीवनविश्व मर्यादित आणि त्यांमुळें अनुभवहि मर्यादित स्वरूपाचा. असें असलें तरी आजूबाजूला जें पाहावयास मिळालें, ज्यानें जिवाला वेड लावलें, संतप्त केलें व हसविलें; त्यांच्या उत्कटत्वाचें आलेखन मी प्रामाणिकपणें केलें आहे.

दुधाचा रतीब घालतात त्याप्रमाणें संपादकांना काव्याचा नियमित ( बहुधा फुकटहि ) रतीब घालणें मला कधींच जमलें नाहीं व तो माझ्या प्रतिभेचा पिंडहि नाहीं. कोणाच्या रागालोभानें, किंवा स्तुति–निंदेनें माझ्या भाव-नौकेचा सुकाणू मी कधींच विचलित होऊं दिला नाहीं. अमकावादी तमकावादी–अशासारख्या वादींच्या नादीं लागून सच्चिदानंद काव्याची गादी मी भिडेखातर भलत्याच गोष्टींना कधींच दिली नाहीं, एवढेंच मला माझ्या काव्यासंबंधीं सांगावयाचें आहे. कवीनें यापेक्षां अधिक कांहीं सांगूं नये. काव्यरूपानें कवि ‘ सांगतच ’ असतो. प्रस्तुत स्थळीं त्यानें अधिक कांहीं सांगणें हा काव्याचा उपमर्द करण्यासारखें आहे !

माझ्या खेड्यांतील वास्तव्यामुळें अनेक कवि-लेखकांशीं माझा परिचय व संबंध केवळ पत्ररूपानें असतो. कवि गिरीश मला अगदीं जवळचे असूनहि दोन वर्षांपूर्वीं काव्यगायनाच्या निमित्तानें सांगलीस त्यांची माझी पहिली भेट झाली. “मासिकांतून प्रसिद्ध होणाऱ्या तुमच्या कविता मी



कवि प्रताप

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम २४७८९ विः काव्य
क्रमांक १८२२ नोंः दिः २६।२।५५

अनुक्रम ...... २५१०९ ...... पि: ......
क्रमांक ...... नों: दि: ......

आवडीनें वाचतों. आपला परिचय यापूर्वीच व्हावयास हवा होता. ' पहिल्या भेटींतील या दोन वाक्यांनीं केवढा आनंद वाटला मला! कवि, काव्यसमीक्षक, काव्यगायक म्हणून त्यांची प्रसिद्धि आहे. त्यांच्या स्वागतशील व प्रेमळ स्वभावामुळें मीं त्यांना प्रस्तावनेसाठीं विनंती केली. फलटण येथील शैक्षणिक कामाची धुरा, फ्ल्यूचा आजार व इतर कर्तव्यें यांतून वेळ काढून माझ्या 'वसुन्धरे'वर आपुलकीनें 'मृगाचे शिंतोडे' टाकले याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी व ऋणी आहे. कविता क्रमांक २–६ व १८ या कविता अगदीं आरंभींच्या आहेत त्यामुळें त्यांत नवशिकेपणा जाणवतो हें मला मान्य आहे; परंतु माझ्या प्रीतिकाव्यांतील कलात्मक सूक्ष्मतेची कविश्रेष्ठ गोविंदाग्रज, तांबे, माधवज्युलियन् यांच्या प्रीति–काव्यांतील सूक्ष्मतेशीं तुलना अप्रस्तुत होईल असें मला वाटतें.

कै. बाबुमामा वेलणकर, श्री. रा. द. वाकणकर, श्री. ना. घों. ताम्हनकर, सौ. अनुसूयाबाई शाह ( माई ) प. पू. स्वामी रामानंद भारती यांचें प्रोत्साहन व प्रेम मला अगदीं आरंभापासून लाभलें हें नमूद करण्यास मला आनंद वाटतो. माझे परम स्नेही प्रा. भगवानराव बाबर 'शेख, शेवाळे, चव्हाण' कंपनी व श्री. राजाराम अरबुने यांचें मला वेळोवेळीं अनेकपरीनें साहाय्य लाभलें आहे.

चित्रशाळेचे श्री. दा. पां. रानडे यांनीं माझा संग्रह पाहून तो सत्वर प्रकाशित करण्याचें आश्वासन दिलें व त्याप्रमाणें वागून सलोखा व सौजन्याची प्रचीति दिली याबद्दल त्यांचा आणि त्यांच्या अनेक हातांचा मी अत्यंत आभारी आहे. बी. टी.च्या अभ्यासांतून वेळ काढून मुद्रितें तपासण्याच्या कामीं माझे नूतन कविमित्र श्री. श. रा. राणे ( भालोद ) यांचें मला फारच साहाय्य झालें; त्यांचा मी ऋणी आहें. मराठी रसिक वाचकांना आणि टीकाकारांना माझी एवढीच विनंती कीं, त्यांनीं 'वसुन्धरा' संबंधीं आपलें मत मला शक्यतों कळवावें. 'सुगन्ध-वारा' व 'वसुन्धरा' यानंतर 'ब्रह्मगांठ' या नाटकाच्या रूपानें तिसरी भेट घेण्याचें आश्वासन देऊन मी आपणां रसिकांची रजा घेतों.

दि. १७ मे १९५८<br>दुधोंडी ( द. सातारा ). } प्रताप

# अनुक्रमणिका


१ जुन्या कवितांनो ! १
२ पिसाट यौवन ? २
३ "सोन्या माझ्या ?" ३
४ मन माझं येडं झालं ? ४
५ हुतात्म्यांचा इषारा ? ६
६ स्वातंत्र्य-सूर्यास ? ८
७ पांच सुनीतिका १०
८ माधवराव बागल १२
९ हीच प्रार्थना ? १४
१० कर्म-महर्षि भाऊराव पाटील १५
११ सरस्वतीचें मंदिर हें १६
१२ वत्सले ? १७
१३ पर्वलीचा शब्द ? १८
१४ मिठी ? १९
१५ प्रणय-पांखरा २१
१६ माझिया मना २३
१७ याद ? २४
१८ धनिकाच्या रे श्वाना ? २५
१९ साने गुरुजी २६
२० बनूं नका बलि कलिकालाचे २७
२१ भग्न-मंदिर २९
२२ झेपावत आल्या ३१
२३ दैवत माझें ३२
२४ तुझीच बघतें वाट... ३३
२५ परिचारिका ३४
२६ भाव-फुलांचा अमोल ठेवा ? ३५
२७ शकुंतला ३७
२८ भावकणिका ३८
२९ पांच कणिका ४०
३० थबकलीं पाउलें ४२
३१ अल्लड बाले ? ४३
३२ साफल्य ४५
३३ अहंगंडास ४६
३४ कधीं तुझें आगमन? ४७
३५ वसुन्धरे ४८
३६ उत्कंठिता ४९
३७ मला वाटतें ५०
३८ येई सखे ? ५२
३९ जाग्रत शंभो ? ५३
४० नव्हतीस जरी तेथें ? ५४
४१ शिलेदार ५५
४२ देवळांतुनी देव निघाला ५६
४३ गर्दभदूत ? ५७
४४ धरली पाऊलवाट ५८
४५ वियोगघटिका ? ५९
४६ आघात ६१
४७ केली कविता ? ६३
४८ कृष्णामाई ? ६४
४९ अवघड कोडें ? ६५
५० तुझ्या आगमनीं ! ६७
५१ मनीषा ६८
५२ साथीदार ६९
५३ ललाट–रेषा ७१
५४ रडावयला कोणी नाहीं ? ७३
५५ रिकामें विडीबंडल ! ७४
५६ तुफान वारा ७५

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५७ | चैत्रपालवी | ७६ | ६३ | मार गिन्ना ! | ८५ |
| ५८ | यावा तो दिन ! | ७७ | ६४ | अज्ञाताच्या गूढ तमांत ! | ९० |
| ५९ | पेटीवरच्चीं तीन माकडें | ७९ | ६५ | नाटक | ९२ |
| ६० | अभंग | ८० | ६६ | चांदणें ! | ९३ |
| ६१ | एक मडकें ! | ८१ | ६७ | कैलास | ९४ |
| ६२ | घना कृपाळा ! | ८४ | ६८ | माझी वेल | ९६ |


• • •

# शुद्धिपत्र

| पृ. | ओळ | चूक | बरोबर |
|---|---|---|---|
| ३ | शेवटची | दे | देई |
| ९ | वरून १४ | अंतरा | ह्रदंतरा |
| २५ | वरून ४ | छे ! | छो ! |
| ५७ | वरून ६ | फिसीत | पिसीत |
| ५८ | खालून ६ | चुळचुळ | चुळबुळ |
| ८८ | वरून ७ | अफराटे | उफराटें |
| ९३ | शेवटची | हंसत | हांसत |

● ● ●

## –समर्पण

मी अर्भक असतां...पित्यास आंचवलेला !
पाठीवर ज्यांचा प्रेमळ हस्त मिळाला
ते जाधव राऊ नारायण ज्या नाम
मातामह माझे पूज्य पवित्र निधान !
अन् मामा माझे...गुंडाजी जाधव
मजसाठीं श्रमती ठेवुनि मजवर जीव
ऋण फिटणें नच...जरि कैक घेतले जन्म
प्रेमाला सेवा...मम हृदयाचा धर्म !
अन् वालू आई...वत्सलता कीं मूर्त
मी वानुं कोणत्या मुखें तियेची कीर्त ?
ती दैवत माझें प्राणाहुनि मज प्यार
प्रभु सदय मजवरी !...सर्वांस्तव नत शीर !

प्रताप

अनुक्रम २४७०९ वि: ८।०५
नों: दि:

# जुन्या कवितांनो !

माझ्या संग्रहींच्या जुन्या कवितांनो,
नाहीं तुम्हां दैवीं कधीं प्रकाशन;
माझ्या पेटींतील गर्द अंधारांत
घालवावयाचें तुम्हांला जीवन !

ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. ४०१२

पायींचे दगड दिसती कोणाला ?
परी त्यांच्यावरी उभी इमारत
जुन्या कवितांनो, माझी ‘ वसुन्धरा ’
तुम्हांवरी आहे उभी विराजत !

शैशवांत केलें तुमचें गायन
ध्येय, भावनांचें आणि आलेखन
मिळें बहुतांचें प्रेम, प्रोत्साहन
झालें उल्हासाचें लालन, पालन !

‘ वसुन्धरा ’ सवें शारदा-मंदिरीं
आज टाकतों मी भक्तिनें पाऊल
रंग, रूप, कांति, गुण, गंध, भाव
ऐशा निकषांत काव्य विलसेल !

कैसें विस्मरण रम्य अशा वेळीं
जुन्या कवितांनो, होईल तुमचें ?
तुमचेंच रूप नव्या स्वरूपांत
तुमचाच भाव नाविन्यांत नाचे !

• • •

## पिसाट यौवन ! : २

फुलली शेवंती पाहून बहर
वेड्याचें मनांत उठलें काहूर
दर्वळे सुवास अंतरीं उधाण
नाचलें यौवन होऊन बेभान !

वाऱ्याच्या झोतानं नाचलें सुमन
पिवळें मार्दव सोनेरी यौवन;
धावला आधाशी फुलाच्या रोखानं
वायूच्या वेगानं ठेपला जाऊन !

झडप घालून कुर्वाळी यौवन
हुंगून हुंगून आंधळा होऊन;
राहिला तसाच पिसाट गुंगींत
समूळ शेवंती घेऊन पाशांत !

उघडी नयन निर्माल्य जीवन !
टाकून फेंकून चालला पळून.
पळतां निष्ठूर ! कांपला समीर
कांपती लतिका थरारें अंतर !

• • •

## " सोन्या माझ्या ! " : ३

सुधारलेल्या प्रसिद्ध नगरीं रस्त्यावरि एक
म्हातारी बैसली भिकारिण अश्रू गाळीत.
फुटक्या काटोऱ्यांत घेउनी शिळीबुरी शेक
तुकड्यांवरतीं माशा, चिलटें ' घों घों ' करतात !

हाडांचा सांपळा, केस ते अंबाडीचा वाख
अंगि न चोळी...लाज राखते जीर्ण लत्तरांत
क्षणाक्षणाला सुस्कारे ! अन् भाव करी मूक
पडते उठते, उठते पडते टांचा घासीत !

दया येउनी, म्हातारीला पाहुनिया उघडें
देई लुगडें; त्या तरुणीचें अंतर गाहिंवरलें !
' वळवाचा पाऊस ' पाडिला पाहुनिया लुगडें
भाळाला लावुनी तिनें तें झणीं परत केलें !

" सोन्या माझ्या नवें नेसतां घालिल कोणी भीक ?
दे असला तर एक जुनेरा दे पैसा एक ! "

• • •

## मन माझं येडं झालं ! : ४

ऐकतां मुरारी शीळ मन माझं येडं झालं !
नसानसांत घुमला नाद पिर्तीचं वारं सुटलं
वाऱ्यांत लोटली काया पन् हाय दिसना राया !
रागु र तुला हुडकाया खिन् गेलं सारं वाया !

चोरून गांठलं रान
पाहिलं आजुबाजूनं
हुर्यांत तुझंच ध्यान

ध्यानांत दंगलं दील मन माझं येडं झालं !
भासांत हांक ऐकली 'मी राणी झाडाखालीं
अंब्याचा पिकला पाड ठेवला तुला म्यां ग्वाड
ये वाऱ्यागत गुंगून बगतुया वाट साजन
वाट्टूळ खपना जीवा पिर्तिचा ठाव का घ्यावा ?'

आल्यें मी राया आल्यें
जरि पायां कांटे रुतले
ऊरांत गुलाबच फुलले

ऊरांत सूर गुल्गूलं मन माझं येडं झालं !
जीवांत मुरत हांसली ती झाडाखालीं दिसली
बिगिबिगी आल्यें धांवत तूं अपलं गानं गात
चोरून तुझ्या मी मागं ना तुला कशाची जाग
झपदिशीं झाकलं डोळं मी 'वळक् वळक्' बी म्हनलं

‘ तूं माझी मेनकाराणी
सर्गातुन गंगेवाणी
डोक्यावर बसली “ म्हौनी ”

‘ साहि सुट्यो ’ तुला मीं केलं	मन माझं येडं झालं !
सोडलं अतां घरदार	तूं माझा र शिलदार
सोडली मानसं सारीं	मी धनीन तूं कार्भारी
अतां कशाचि उरली चोरी	चल जगापुढं सामूरी
हातांत घेउनी हात	सौसार करूं सांब्रत

बघ वारं सुटलं आतां
येलीला झोंबतंय् जातां
मद, वास लुटतया गातां

हासवतं फुलं अन् येल	मन माझं येडं झालं !

● ● ●

## हुतात्म्यांचा इषारा ! : ५

" कडाड कडकड, कडाड कडकड, वीजेचा घाला
घडाड घडघड, घडाड घडघड फेकूं वज्राला,
भडाड भडभड, भडाड भडभड अग्नीचा हल्ला
थडाड थडथड, पाडूं सगळा अमानुषी किल्ला !

मानवतेचें रक्त पिणारे सावध व्हा सारे
रे असुरांनो, जाळू अवघे स्वार्थी डोलारे.
' स्वतंत्र झालों, स्वतंत्र झालों ! ' पुरे अतां घोशा
वाचि-विरांनो, सार्थ करा कीं ती अपुली भाषा !

श्रमलों, दमलों, रक्त ओकलों रे तुमच्यासाठीं
युगायुगाचे आम्हि भिकारी भूक-आग्नि पोटीं
कणकणानें झिजलों झिजलों ! श्रम गेले वायां
कण अन्नाचा दिसला नाहीं कुठें तुम्हां माया !

वडिल, पितामह, मुलें आणि मी भिकारीच सारे
वडिल, पितामह, मुलें आणि तूं गादीवरि कां रे ?
उतरा आतां लोदकिड्यांनो, जा सारे खालीं
परंपरा संपली अतां ती...जी होती भालीं !

' थोर हुतात्मे, थोर हुतात्मे ! ' कशास म्हणतां रे !
आणि कशाला बलिदानाचीं गाणीं गातां रे ?
मानवतेच्या पूजेसाठीं पडलों संग्रामीं
मानवतेच्या पूजेसाठीं जन्मूं या भूमीं !

स्वतंत्र झाला, स्वतंत्र झाला भरतखंड (!) सारा
स्वतंत्र झालां, खा धनिकांनो सौख्याचा वारा.

रक्तपिपासू ! तुम्हांसाठिं का आत्महोम केला ?
गरिबांपोटीं स्वतंत्र वारा जाइल का बोला ?

झुलव्या भुलव्या नको अम्हांला सहानुभूतीतें
गडगडाट रे श्वेत घनांचे भिजविति का शेतें ?
उफाळून ये क्रोधसागरीं प्रचंड त्या लाटा
प्रलयकाळ हा येई जवळी जाणा मानवता !

इंधन पेटें पोटामार्जी येत प्राण कंठीं
चर्चा कसल्या करतां कानू नी भेटी गांठी ?
रे स्वार्थ्यांनो ! रे भ्याडांनो ! भुलाल पैशाला
धडाड धडधड, कडाड कडकड येऊं भेटीला !

• • •

## स्वातंत्र्य-सूर्यास ! : ६

झरझरा वरी येऽ भास्करा
बघ खळबळ लाटा जनरुधिरा ! ॥ ध्रु० ॥

घरोघरीं बघ गुढ्या रोविल्या
कर्पुरज्योती किती तेवल्या
जीवनज्योती प्रमुदित झाल्या
ये ओवाळुन; दे करुं मुजरा !

प्रभातफेऱ्या ठायीं ठायीं
घोष भिडाले नभास पाही
पुढें कोणतर गाणी गाई
नाचती; देहभान् नुरें जरा !

नभांत कसला गजर उडाला ?
कोण थवा हा मुदित जहाला ?
डोळ्यांवाटें मौक्तिक-माला !
तीं टिपें भूषवित आजि धरा !

दत्त, सिंग, बट्ठु, मल्लापा ते
महेंद्र, बाबू, बाल, लाल ते
पाल सोबती कोतवाल ते
ते हांसत नाचति गरागरा !

“ आज आइ गे फांस निघाला
सूळ आजला बोथट झाला
हे घे अश्रू तव पदकमलां
हांस ना, हांस गे वराति जरा ! ”

या बागेंत झडल्या फैरी
पटापटा मग पडतां सारीं

प्रेतावरती नाचे वैरी
ओढती श्वानसम फराफरा !
वंग देशिं या काय जहालें ?
रक्ताचे ना पाट वाहिले ?
सूर्यानेंही तोंड झाकिलें
तें वदण्या सारें अचल गिरा !
किरण फेंक तव त्या रक्तावर
उडतिल कण मातीचे वरवर
स्वच्छंदानें फिरतिल गरगर
फेंक रे, फेंक तव शूर विरा !
घोष ऐकतां तव नामाचा
मडकें घेउनि भिकारि साचा
काय विस्मयें बघि निर्वाचा ?
का बघशिल त्यांच्या अंतरां !
मजुर गांजला गिरणीमाजीं
थोड्यांतच बघ कृषिवल राजी
कोण तयांवर चरतो पाजी ?
ये शोधण्यास, ये त्या असुरां !
बघण्या मग तूं करशिल धडपड
पाजी ढग हे मधेंच करतिल
अंधारांताचि जिवें मारतिल
रे सावध सूर्या ! मोदवरा !
असुंदे खादी, भगवें वस्त्र
तुझें असूं दे जवळी अस्त्र
असाच येशिल जरि तूं अत्र
नाचेन मुदें तर सौख्यकरा !

## पांच सुनीतिका : ७

### १. मेघदूत

" नयनीं प्राण आले ! जिवा लागे हूरहूर
रोज भेटसी याच वेळीं, आज कां उशीर ?
नको करूंस वंचना ... कळूंदे वर्तमान ...
काय काय आणसी जिवलगा ? करी रे उड्डाण !

आला माझा आला मेघदूत राणा
खाकी वेषधारी ये रे पोस्टमना ! "

### २. हेतू

ओठ तांबडे, नखांस मेंदी, नयनांना सुरमा
पॉवडर-स्नो फासला .... शोभते टिकली मुखचंद्रमा
कलाप काळा, मोहक चाळा, झुलवी तरुणांना
गुलाबी पातळ नेसुन येसी .... पुढें पुढें कां पुनः पुनः ?

' कां पुनः पुनः ? प्रणयाच्या त्या गोड भावना—
हृदयीं भरल्या; शोधिती ना त्या प्रिय सजणा !

### ३. आरोप

शकुंतलाः—खेंचुनी किती गे बांधलीं वल्कलें
भरुनिया आले उर माझे !
छातीवर पहा ... बोंचलीं किती हीं
तुज नाहीं क्षिती माझी थोडी !

अनसुयाः—सखे शकुंतले ! मज कां ताडन ?
यौवन तुझें गे भरा आलें !

## ४. आधुनिक शकुंतला

" झटदिशीं गेला राणा समोरून
पाहूं कशी त्याला मान वळवून ?
नाहीं दर्भ खालीं पायीं टोंचण्याला ....
नाहीं झाड इथें साडी गुंतण्याला ! "
आपुल्याच झोका बघ वळून वळून
अन् हळूंच चोरून दृष्टि दे फेंकून !

## ५. सत्य स्वप्न

जागरूक पडलों होतों मी बिछान्यावर
अन् गुंगून गेलों स्वप्नीं अगदीं चूर
फुललीं फुलें, मनही खुलें ... अहा छान देखावा !
अरे ! स्वप्नांतील फुलांना वास कसा यावा ?
डोळे केले .... जरा किलकिले .... अन् पाहिलें—
तों समीप राणी उधळित होती फुलें ! !

• • •

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ........ विः ........
क्रमांक ........ नोंः दिः ........

## माधवराव बागल : ८

तूंच हृदींचा ठाव घेतला
तुला माधवा मनीं पूजिला ! ॥ ध्रु० ॥

तुला पाहतां हृदय नाचतें
चैतन्यानें डोलुं लागतें
त्वेष-करुण जंव वाणी होते—
नयनां येती अश्रु घळघळा !

मानव्याची ज्योति चिरंतन
सदां तेवते गरिबांकारण
पिसाट-वारा दमतो फुंकुन
क्षिति न तयाची मुळींच तुजला !

प्रमत्त, पाजी नोकरशाही
यांच्या जुलुमासवें लढाई
देतां, तनु तव जर्जर होई
परि आत्मा तव ना डगमगला !

तुला बंधनीं छळ छळ छळलें
तनू ठेंचली, दांत पाडिले
फटके मारित धुंडित नेलें
गहिंवर आला मानवतेला !

जातभाइनीं तुला निंदिलें
स्वार्थ्यांनींहि पुरें भोंदिलें
विशाल हृदया विदीर्ण केलें
तरि दिव्यात्मा नाहीं नमला !

स्वप्न तुझें ना भंगुनि गेलें
स्वप्न तुझें अति विशाल झालें
विराट जन बघ उत्सुक झाले
स्वप्नपूर्तिस्तव घे साथीला !

भांडवल्यांची रावणशाही
तव ' देवांना ' चिरडूं पाही
शिव-बापू-अभिमानी भाई—
तयार आम्ही सत्य लढयाला !

• • •

## हीच प्रार्थना ! :९

तृतिय नेत्र उघडुनि भोल्या दाहि दुर्जना ! ॥ध्रु०॥
नांव तुझें सांबच भोळा
सहन करिसि किति खलचाळा ?
उघडि उघडि आतां डोळा धांव मर्दना !

स्तुतीस्तोत्रिं गाती महिमा
भुलूं नको बगळ्या अधमा
कृतीमधें उलट्या हृदया छेद छेद ना !

करीं तुझ्या भेदक शूळ
खलां हाच कर्दनकाळ
गरिब पिळुनि ऐदी ऐशा मार लडदुंना !

जटेमाधिल अवखळ गंगा
धडाडून करुं दे दंगा
बुडवुनी गरिब, जे तरती बुडवि त्या जनां !

कृष्णसर्प धरणीवरतीं—
सोड भोल्या करुंदे फिरती
गरिब जिवां चावाति जे त्या करुं दे दंशना !

तांडवाची नाहीं जरुरी
नको पृथ्वि हलण्या सारी
वाजुं दे ' इषारा-डमरू ' घुमुं दे गर्जना !

कृपेसाठिं तव चरणाला
कपटि रचिल धनसुममाला
फसूं नको त्या समयाला हीच प्रार्थना !

● ● ●

## कर्म-महर्षि भाऊराव पाटील : १०

ती मूर्तस्वरूपी पाहुनिया मानवता
ही खळखळ करते माझी जीवनसरिता.

गंभीर मुखावर विलसे दाढी धवला
शोभते तनूवर खादी निर्मळ अतुला
स्फुल्लिंग दिसे नेत्रांत हृदीं मानवता
अनवाणि निघाला कुठें असा एकला !
हा निघे महात्मा त्यागुनी आत्मसुखाला
अज्ञान जेथ नांदतें... गरिब गांजला
अन्याय, जुलुम पाहून कंठिं दाटतो
अन् उठतो त्यांसीं धैर्यानें लढण्याला !
ज्ञानाची गंगा घेउनिया हा आला
मज वाटें भगिरथ पुनः असे ठाकला
अज्ञान क्षाळुनी संजीवन हा देतो
अन् प्रवृत्त करतो तोडाया शृंखला !
अजि जागृत होतां दुनिया ही श्रमणारी
ते 'धर्म-वित्तप्रभु' ओकिति गरल विषारी
विष पचवायाला समर्थ 'भोला' झाला
ही कर्मविरांची प्रबला किमया सारी !
उत्साह दांडगा... नको तया विश्रांति
जगिं सत्य, अहिंसा आणि स्थापणें शांति
हा ध्यास लागला बापूजींचा त्यांसीं
जनमनांत करतो ज्ञानप्रकाशें क्रांति !

ती मूर्तस्वरूपी पाहुनिया मानवता
ही खळखळ करते माझी जीवनसरिता.

• • •

## सरस्वतीचें मंदिर हें : ११

खुशाल गा रे घरांत गा पण,
तुला 'असे तो छंद'
नकोस मानूं कलावंत तूं
जननिंदेचे बंध!
विकारतेची प्राशुनि दारू
जरि तूं होशिल धुंद
झिंगत येतां जनतेमाजीं
करील ती प्रतिबंध!
असो कृती तव साधी भोळी
चुको जाति वा छंद
हवा आम्हांला सुवास केवळ
नको तुझा दुर्गंध!
'ज्याचा त्याचा मार्ग निराळा'
—भोग तिथें आनंद
पथांत अमुच्या कां लुडबुडसी
पिसाट कवि मतिमंद!
खळखळते का मानव्याची–
गंगा; तव हृदिं फंद!
शुष्क रसाविण शब्दांचे ते
सांगाडे कर बंद!
सरस्वतीचें मंदिर हें रे,
हवा इथें धरबंद
तव सुमनांचा दरवळुंदे रे
दिशादिशांत सुगंध!

● ● ●

## वत्सले ! : १२

लोचनीं कां आसवें हीं आज आलीं वत्सले ?
दीन कां गे ? म्लान कां गे ? शल्य कांहीं का सले ?

पौर्णिमेची शर्वरी तूं चांद वदनीं हांसरा
झांकळे कां आज ऐसा चारुगात्री सुंदरा ?
यौवनाची ती कुठें गे वेधणारी चारुता ?
ती रतीची स्निग्ध दृष्टी कां रुसावी गे अतां ?

लोटलीं गे चार वर्षें विस्मरेना त्वत्स्मृती
चित्त माझें चिंतिते ती दिव्य तूझी आकृती !
दूर गेलों ध्यास लागे, ध्यास लागे निशिंदिनीं
खुळें मन हें धांव घे अन् तुजकडे ये मोहुनी !

चांदणी ती रात्र स्मरतें स्वप्न रचिलें गोडसें ?
मी सखा अन् साजणी तूं हाय विरलें तें कसें ?
रूढलेल्या बंधनांनीं मार्ग तूझा रोखला
अन् सखे मी निराशेचा पुरा प्याला प्राशिला !

पाउलें कां आज वळलीं मजकडे ? हो मुक्तता ?
हो ! परी मी जोखडाला जुंपलेला गे अतां ! !

• • •

## पर्वलीचा शब्द ! : १३

नका कुणी रोधूं मजला सांगतें तुम्हांला
पर्वलीचा शब्द सखिंनो कानिं आला आला ! ॥ ध्रु० ॥

किती रात्रि जागुन गेल्या पहाण्यांत वाट
झोप नाहिं माहित नयनां नाहिं गांठ भेट
जीव झुरे त्याच्यासाठीं ओढ मन्मनाला !

चंद्रतेज हृदयीं आलें निशा दूर झाली
खुदूंखुदूं हांसत माझे भाव मखमाली
मंद वात झाला धुंद आणि सुगंधाला !

प्रीतिसाठिं वेडी झाल्यें नका हसूं कोणी
कळायची नाहीं तुम्हां हृदांतली वाणी
प्रणय-संगिताचे सूर खुलवितात त्याला !

पुरे पुरे थट्टा आतां ताणुं नका तार
व्याकुळला कोमल ऊर होइन बेजार
अशा कशा निर्दय होतां याच सुमाराला !

शब्द तोच कानीं आला सोडा माझी वाट
छळूं नका आतुर जीवा...जाच हा पिसाट
जाउंद्या ग द्याया साथ....साथ कूजनाला

आज माझा प्रीति–कोयल हांकेवरी आला !

•••

## मिठी ! : १४

आईच्या मिठींत विश्वांतली माया
नको देवराया अन्य कांहीं.
आईच्या सभोंतीं सुदर्शन चक्र
कसें भयचक्र भेदील तें ?
आईच्या मिठींत सुख आणि शान्ति
मज नसे भ्रांति कोणतीहि.
—सरें बालपण पातलें यौवन
गुंतलें मन्मन कोठेंतरी.
पाठीं मायमाया पुढें चित्र जाया
ध्यास 'जाया जाया !' हाचि लागे !

*

झालों मी गृहस्थ येत नवी कोण
टाकिलें मारून चंद्रिकेनें.
क्षण कांहीं वाटें नको दुजें कोणी
कटाक्ष-लोचनीं दंग व्हावें.
पत्नीच्या मिठींत फुलांचें मार्दव
वाणींत लाघव गोड गोड !
पडतां गळ्यांत कर-पुष्पमाला
प्रेमपूर आला हृदयाशीं
फुललें चांदणें गंध दरवळे
प्रेम-पुष्प-मळे भरा आले !

*

संपला वसंत धांवला शिशिर
काया थरथर कांपतसें.
नाहीं अव्हेरिलें सात्त्विक प्रेमास
परि मज आस नवी लागे.
भेटले सन्मित्र, सज्जन, दुर्जन
लागले लोचन दूरवरी
संपे मोहमाया निर्विकार काया
नुरे भीति वाया मजलागीं.
अनंत अनंतीं होईन विलीन
ब्रह्मरूप जाण काळमिठी !

• • •

दा. क्र. १०२२

## प्रणय-पांखरा : १५

धरायचा का असा अबोला अल्लड सौदामिनी
कसा लाविसी जिवास चटका विरहाचा मानिनी !
सन्निध असुसी, परि न बोलसी, कठोर ही जाचणी
मान वळवुनी मग कां बघसी आतुरल्या लोचनीं ?

वाचायाचें ढोंग !...पुस्तकीं लपला मुखचंद्रमा
हुंगायाचें नसतें वेडें ! सरस्वतीच्या सुमां !
कसलें वाचन ? उलटें पान न ! बघसी डोकावुनी
उलटें पुस्तक ! ! तूं तर गमसी ' ढगाआड चांदणी. '

मला आवडे रंग मोतिया...चतूर तूं प्रणयिनी
असेंच पातळ नेसुन येसी नवें नवें अनुदिनीं.
अनुरागाचीं उधळित जासी शोभा सायंतन
चोरुन बघसी भाव कळविसी आषक नयनांतुन !

करांत तुझिया सखे, सुगंधित रातराणिचीं फुलें
फेंकित, झेलित, विहरत येसी समोर तूं वत्सले.
क्षणभर रोखुन नयनबाण अन् पुष्पबाण दावुनी—
शरपंजरिं तूं कसें पाडिसी मला जादुगारिणी !

विणकामाचें केंव्हांपासुन वेड तुला लागलें ?
चंदेरी स्वप्नांतिल अपुल्या गुंफण ही तर खुलें.
बळेंच ओढुन माझ्यापुढतीं ' गुंडाळा ' लोंकरी
धांवत येसी त्यास धराया...सावज मी गे परी !

कधीं अचानक मम काव्याशीं करिसी तूं गुंजन
सप्तसुरांचें मूर्त वाटतें भरलें संमेलन.

कितो आर्तता ! भावविव्हशता सुलभच नवयौवना !
भुंवया उडवित खिदळत जासी येतां अभिनंदना !

पुरे मैत्रिणी ! असा अबोला, लपंडाव प्रीतिचा
असाच असतो प्रणय-पांखरा खेळ मुग्ध नवतिचा !
हृदयीं घुमतें एकच संगित, चालें तव चिंतन
कधीं व्हायचें सांग आपुलें सखे, स्निग्ध मीलन !

• • •

## माझिया मना : १६

रे मना, विसर क्षण जीवन वास्तवतेचें
आहेच नशीबीं वणवण भटकायाचें;
नयनांचीं मिटलीं पातीं ओलवलेलीं !
चल पाणवठ्यावर प्रशान्त कृष्णाकांठीं
थांबलों प्रियेच्या जिथें मीलनासाठीं !

नयनांतुन सखिच्या झरतां अमृत-ज्योत्स्ना
रे मना, तूझिया जिवास लागे तृष्णा.
तूं लाविलीस मज ओढ कळेना कैसी ?
चंद्रास देखतां, भरती ये सिंधूला
अन् बघतां तिजला तशीच मम हृदयाला !

जरि सागर उत्सुक चंद्राला भेटाया
अभिलाष तयाचा सदांच जातो वाया.
विफलता प्रीतिची लावी त्यास झुराया;
ती इंदुमुखी तर मलाच ये भेटाया
अन् मीहि निघालों तिजला आलिंगाया !

कर-कमल-सुमाला गळ्यांत अलगद आली
हो सार्थ आजला मुग्ध प्रीतिची बोली.
मीं सहज पाहिलें वरतीं आकाशांत;
अक्षता रुपेरी शशाङ्क उधळित होता
गातसे समीरण शुभमंगलमय गीता !

चंदेरी स्वप्नांतिल ही आतां दुनिया
रे मना माझिया ठरली केवळ माया
चल उघडुन नयनां वास्तवतेच्या जगतीं.
ही इंदुमुखी बघ आज दुज्याची भार्या
उसळणें कासया मम हृदयाचा दर्या ?

● ● ●

## याद! १७ :

याद आज आली आज अचानक
पाडसा रे माझ्या दूर मी कितीक--
मैल आलों; पोट जाळण्यास येथें
सुखें कां सुखें का ? कळा अंतरातें !

याद आली आज तुझी रे पाडसा
शेजारचा बाळ खोकला थोडासा
खोकल्याची ढास येतां कानावर
व्याकुळला जीव कालवें अंतर !

लोटुनिया गेले दिस वीस तीस
केलें खोकल्यानें तुला कासावीस
इवल्या जिवाचे देखुनिया हाल
झालों मी अस्वस्थ चरकलें दील !

रात्रीचा दिवस करून वेल्हाळा
पाळणा हातांचा करून रे बाळा
तुला हालविलें घेतलें पोटींशीं
रंगलों तेव्हां मी मातृभूमिकेशीं !

आज शेजारचा बाळ खोकला रे
तुझ्या आठवानें हृदय थरारें
दिस फार झाले पत्र नाहीं आलें
शेजारच्या बाळा छातीशीं घेतलें !

• • •

## धनिकाच्या रे श्वाना ! : १८

धनिकाच्या रे श्वाना भुंकतोस तणतणुनी
जागतोस तुकड्याला धन्य प्रवृत्ती इमानी !
चोर असो, साव असो दिसतां ते गुरगुरशी
'छे!' म्हणतां धावुनिया दंश तया तूं करसी.

रक्षाया तत्पर तूं घर, मालक आणि वित्त
जागतोस रात्रंदिन चाहुलीकडेच चित्त.
तुकड्याच्या रे दासा ! काय तुला कपट कळे ?
तिजोरींत धनिकांच्या गरिबांचा जीव सले !

रे गुलाम निर्बुद्धा दीप इथें लखलखले
गरिबांच्या जीवांची ज्योत जळे ! ज्योत जळे !
बघ बडगा, बघ खड्गा धनिकाच्या रे श्वाना
मालकासवें तूझ्या पडाशिल तूहि उताणा

श्वाना ! हें विसरलास तूं वाघ्या जेजुरिचा
करुनि घेसी 'येळकोट' 'भंडारा' जन्माचा !

• • •

## साने गुरुजी : १९

काळास कशी हो तुम्हीं मारली हांक ?
कां अवचित गेलां सोडुनिया भूलोक ?
हीं फुलें, मुलें अन् रानपांखरें दीन
ढळढळा गाळुनी अश्रू...करती शोक !

हंसणारे रडले, रडणारे हांसले
वाचुनी कथा त्या अंतर भारावलें
लाविला चिरंतन ळळा जीव हो खुळा
कां असें तातडीं आम्हांला सोडिलें ?

" तातडीं निघालों कुणी म्हणो मज खुळा
तडफडला मासा जीव जळे आगळा
बेचैन जिवाची नुरली सरली आस
स्वप्नांची माती होय मिटेना डोळा !

रक्ताची करुनी शाई लेखन केलें
मीं स्वप्न मनोरम भाग्याचें उभविलें
या स्वप्नासाठीं कितीक झालें दग्ध
मी कशास उरलों ? स्वप्न भंग जाहलें ! "

आहेत बहू पण तुम्हांपरी कोणि न
निज सुखास सांडुन वेंचितात जीवन
रंजल्या-गांजल्यासाठीं श्रमलां दमलां
तळमळलां गुरुजी ! तनूंत जरि ना त्राण !

तारकांपरी हो पवित्र तुमचें मन
अंबुधीपरी तें गभीर अन् जीवन
मज वेड लागलें एक ' कसें मी व्हावें ? '
प्रणिपात तुम्हां हा व्याकुळले मम प्राण !

• • •

## बनूं नका बलि कलिकालाचे ! : २०

महाप्रतापी नेते अमुचे
विराट आम्ही बलहि तयाचें
खबरदार जर स्वैर व्हाल तर
बनूं नका बलि कलिकालाचे !

तुम्हां घेउनि खांद्यावरती
मुदें नाचलों अद्वैतानें
पायामाजीं पकडुन माना
कशीं दापितां दिव्य जीवनें ?

शरीरांत ना आत्मे अमुचे
शिवराज्याच्या वातावरणीं
पार्थिवतेच्या मानांभंवतीं
कशास जोखड ? वृथा संगिनी !

खुशाल झडुं द्या तुमच्या फैरी
खुशाल घाला अम्हां बंधनीं
शिवरायाचे सैनिक आम्ही
हलवूं थरथर जुलमी धरणी !

हिरव्या पिवळ्या रे सर्पांनो
अम्हां वाटलां पाचूं, सोनें
जळो कान्ति ती, गरल विषारी
पुरें पुरें तीं अतां वर्णनें !

अहा सर्प तर आम्ही मुंगुस
नातें आहे युगायुगाचें;
दांत विषारी विदित अम्हांला
अमृत अमुचें मुळीं न कांचें !

भोळे शंकर सांभच आम्ही
दंशाच जर का झाला भालीं;
नाहीं खंती नीलकंठ हो
रिचेल विष ना मानांखालीं !

बहुजन सागर जागृत झाला
भिणार का तो अहिं-मगरांना ?
प्रलयकाळ जर नको असे तर
माणिक मोतीं विखरुन द्या ना !

सोसाट्याचें सुटलें वारें
धडाड पडातिल हे डोलारे
पाचोळ्यापरि उडाल सारे
तारक एकच मानवता रे !

महाप्रतापी नेते असुचे
विराट आम्ही बलहि तयांचे
खबरदार जर स्वैर व्हाल तर
बनूं नका बलि कलिकालाचे !

• • •

## भग्नमंदीर : २१

डबडबल्या नयनीं दिल्यास माझ्या कविता
ज्या गुणगुणतां तूं...अवतरली रम्यता
कां स्फुंदन, स्पंदन चालें सखये असें ?
तूं भासतेस मज पूर्णच कारुण्यता !

थरथरति गुलाबी ओठ...शब्द ना फुटे
ती व्याकुळ दृष्टी ठरेच ना गे कुठें;
मधुबाले ! झालें काय तुला, ना कळें
का भग्नाशेनें अंतर तिळतिळ तुटें !

जडपायीं निघालों...हृदय होय गे खुळे
घोटाळें तेथें; कसें तुटावें जुळें ?
हुरहूर लागुनि संग्रह मीं उघडिला
तव ' लिखित ' वाचुनी जीव सखे तळमळे !

" उभविल्या स्वप्नमंदिरा कसें त्यागिलें ?
ज्यामधें निशिदिनीं तुम्हांस मी पूजिलें
नयनांस लागली धार...सदां झरणार
हृदयास लागली आग कसें गांजिलें ! "

: उधळून टाकणें स्वप्नांचें मंदिर
तुडवून भावना कांपावें अंतर :
हा खेळ विधीचा निर्दय चाले सदां
खदखदां हांसतो काळ सखे भेसुर !

उभाविलें मैत्रिणी असेंच मीं मंदिर
तें कोसळलें गे माझ्या हृदयावर

आतूर भावना छिन्नभिन्न जाहल्या
अन् अळवित बसलों शोकगीत कातर !

हृदिं होम धडाडे...समोरही तो जनां
आशांची झाली राख...खाक भावना
शुभमंगल होवो तुझें आस ही मना
गे ' तांदुळ पडले ! ' माझ्यावरि शोभना !

● ● ●

## झेपावत आल्या : २२

झेपावत आल्या वर्षाऋतूच्या धारा
उत्कंठित झाला भूमिभाग हा सारा
तापल्या जिवाचा आज थांबला ध्यास
मातींतुन सुटला मादक मंद सुवास !

झेपावत आल्या वर्षाऋतूच्या धारा
डौलांत नाचतो मत्तमयूर पिसारा
तें नर्तन बघतां गेलों वेडावून
जाणली जिवानें नवीन कसली जाण !

झेपावत आल्या वर्षाऋतूच्या धारा
लागला म्हणाया खट्याळ गाणें वारा
तें गीत ऐकतां झालों मोहित धुंद
अन् गाऊं लागलों प्रणयगीत स्वच्छंद !

झेपावत आल्या वर्षाऋतूच्या धारा
मीं झणीं सोडिला घरचा उष्ण निवारा
चातकापरी मी उभा ठाकलों दारीं
अन् गात्रें भिजतां लहरे प्रीत लकेरी !

झेपावत आल्या वर्षाऋतूच्या धारा
त्यां नव्हेत धारा....प्रेमरज्जुच्या तारा
का प्रेमाश्रू तव सखये वेगें झरती ?
मम हृदय-शिंपला बनविल त्यांचे मोतीं !

• • •

## दैवत माझें : २३

पंढरींत त्या नाहीं माझें दैवत आवडतें
विठाई; जें भजती भाविक

दीड खणांच्या झोपडींत मम सदां वास ज्याचा
तयाचा विनम्र मी सेवक.

कटावरी कर, उभें विटेवर, असें नसें ध्यान
जयानें उद्धरिले संत

अविरत श्रमणें मम सौख्यास्तव, हेंच तयास जिणें
मन्मना वाटें बहु खंत.

कारुण्याला ठेवुनि पोटीं वदनावर हास्य
आणणें हेंच जया ठावें;

दारिद्र्याच्या झळा लागतां, त्याही साहून
फुलासम मजला फुलवावें.

मला लाभतां यश, कीर्ती ये आनंदा भरती
तयाच्या कृतार्थता; वाटे

माझेंपण मी विसरुन जातों त्याच्या आनंदें
उरीं मम भक्तिभाव दाटे !

जरा कुठेंसे दृष्टीपुढुनी मी जातां दूर
होतसें तें चिंतातूर

नयनांमधली वत्सल-गंगा येइ खळाळून
जरा मज भवतां आजार !

पावित्र्याचें मंगलमय हें स्वरूप साकार
पाहतों इथेंच परमेश

दैवत माझें माय माउली ती माझी जननी
तिचा मी दासानूदास !

● ● ●

## तुझीच बघतें वाट.... २४ :

इथें मी तुझीच बघतें वाट !
भेटीसाठीं तुझ्या राजसा, चढल्यें अवघड घाट ! ॥ध्रु०॥

ओढ लागली तुझी अनावर
वेड लाविते तुझीच हुरहुर
आल्यें येथें ठेवुनि सखया नदी-किनारीं माठ !

मी तर भोळी मुग्ध किशोरी
तव विरहाचे बाण जिव्हारीं
व्याकुळ झाल्यें, धांवत आल्यें, नाहीं केला थाट !

करपाशीं तव इथेंच रमल्यें
तव अधरींचें अमृत प्यालें
चंदेरी किरणांची रापण झरली जणुं बरसात !

सवें प्रीतिनें गातां गाणीं
दऱ्याहि गाती साथ करोनी
फुलें उमललीं वेलीवरतीं सुगंध सुटला दाट !

'इथेंच भेटूं' म्हणालास तूं
कसा न येशी अजुनि परन्तु ?
उधळुन लावूं नकोस माझीं स्वप्नें वाटोवाट !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ......... विः .........
क्रमांक ......... नोंः दिः .........

## परिचारिका : २५

स्वामित्वाचें तुझ्या राजसा कुंकु न मज लाभलें
संसाराचें स्वप्न मनोरम अवचित कीं भंगलें
भिजवित पाउलवाट आंसवें...प्रेमबंध तोडुनी
दूरदूर गेलास बनवुनी मजला चिरविरहिणी !

व्यथित जिवाचे जमवुनि तुकडे ठेवियलें अंतरीं
भग्नाशेच्या चिंध्या वेंचित बसलें वरचेवरी
प्रीतीचें राऊळ खिन्न अन् उदास रे जाहलें
उदासतेचें घेउन ओझें वैराणीं पातलें

तेव्हांपासुन कधिं न चाललें मदन-रती-क्रीडन
भकास हृदयीं; असातिल भ्याले मजला ते पाहुन-
तुझ्यावीण गतधवा तेधवां निष्प्रभ मी चंद्रिका
ढगाळलेल्या जीवन-कलहीं झालें परिचारिका !

अनाथ, पीडित मानव्याच्या सेवेला जागणें
दीन जनांचे अश्रू पुसणें हें मम झालें जिणें
खाटेवर रुग्णालयिं पाहुन आज अचानक तुला !
हृदयीं माझ्या सुखदुःखाचा सागर हेलावला !

भाग्य म्हणूं का काय ? ना कळे, व्याकुळलें अंतर
ठेवूं दे रे क्षणभर माथा तुझिया पायांवर
करुं दे सेवा गाळित अश्रूं...अश्रू-संजीवन-
बांचवील रे तव पत्नीच्या सौभाग्याचें धन !

• • •

## भाव-फुलांचा अमोल ठेवा ! : २६

मावळतीला झरझर धांवे सूर्यसखा आतुर
संध्या-वदनीं आणि विलसला अरुणराग सुंदर
तरुराजींतिल पक्ष्यांची ये किलबिल कानावर
मनास माझ्या वेड अनामिक लावितसे हुरहुर !

उंच हवेली दृष्टिपथां ये सहज वाट चालतां
गवाक्षांतुनी मच्छरदाणी दावितसे रम्यता.
कोण थांबली करांत घेउन फुलें...तिथें कामिनी
अरुणराग कां पाहत नाहीं पश्चिममुख होउनी ?

फुलें कासया ? वेणीसाठीं ? मुदित कराया पति ?
शयनमंदिरीं शेज सुगंधित भूषवील ही रति ?
मंथन चालें मनांत माझ्या आणि अचानक तिनें
सहज पाहिलें मला खालतीं विदीर्ण झालीं मनें !

पाय थांबले, विगलित झाले झणीं थांबली गति
भग्न प्रीतिची जाड शृंखला व्यथित करी मम मति
बहुत दिसांनीं दोन जिवांची दुरुन भेट जाहली
नजरांचा अन् संगम होतां पुष्पें कोमेजलीं !

बाण जिव्हारीं पूर्वी बसला कसातरी साहिला
त्या जखमेची तीव्र वेदना जाळितसे आजला
आर्त जिवाची झरली वाणी तिचिया नयनांतुनी
अवचित आली जाचक, भेदक हांक तिला आंतुनी !

थरथर कांपे हरिणी जैशी गळलीं खालीं फुलें
झटकन शिरली घरांत करुणा पुसुनी अश्रू-जलें
रस्त्यावरतीं पडलेलीं तीं पुष्पें मीं वेंचिलीं
आर्द्र प्रीत ती हृदयीं धरली, प्रेमभरें हुंगिली !
संध्या-रमणी, सूर्यसखा तो गेले नकळें मला
किरकिर चालें रातकिड्यांची तिमिर महा दाटला
चल ठेंचाळत, इथें थांबणें गोष्ट नव्हे ही बरी
भाव-फुलांचा अमोल ठेवा ठेवी निज अंतरीं !

• • •

## शकुंतला : २७

दुष्यंता ये अजुनी चाहुल ! ॥धृ०॥
मीलन होतां दोन जिवांचें
त्या कुंजांतिल वेलीवरचे
नाचुं लागले गुच्छ फुलांचे
निशिंदिनिं वळतें तिकडे पाउल !

दिल्या घेतल्या प्रीतसुमांची
शय्या केली नवलाईची
येतां तेथुन सौगंधाची—
लहर आश्रमीं; होत्यें व्याकुल !

कमलदलांवर भाव रेखिले
आज तयांचे कंटक झाले
हृदयीं माझ्या टोचुं लागले
येतो का मम आठव ? चंचल !

तुझ्या चिंतनीं मिटले लोचन
'चल सम्राज्ञी !' वदसी हांसुन
स्वप्नच केवळ ! स्फुरतें मन्मन
विरहिं तुझ्या मीं हो शोकाकुल !

हीच रीत का तव प्रीतीची
वचनें देउन वंचायाची ?
भीति वाटुनी मज तातांची
मनांत माजे बहु कोलाहल !

पाहुं किती तव वाट नृपाळा
स्त्रीजाती का रे पाचोळा ?
फसली जरि ही वेडी बाला
तळतळाट मम तुजला शासिल !

• • •

## भावकणिका : २८

ही निशाच पळते सूर्याच्या कां पाठीं ?
का सूर्यच पळतो तिचिया भेटीसाठीं ?
छे ! दोघे पळती परस्परांच्या मागें.
गे सखये ! असतां प्रीती पोटीं ओठीं;
कां वृथा करावी आपण ही दमछाटी ?

★

" जग दिसतें केवळ मायेचाच पसारा
हें मृगजळ सारें...कन्या, धन, सुत, दारा "
चालतें सदोदित पुराण सायंकाळीं.
मग सीतेसाठीं राघव कां हो कष्टी ?
कां निशीं पुराणिक करतो गुलगुल गोष्टी ?

★

गुणगौरव होतो, सभेंत मिळतो मान
अन् गळ्यांत पडती हार फुलांचे छान;
परि वाटें...तांत्रिक, यांत्रिक, कृत्रिम सारें.
तूं प्रीतिपुष्प जें दिलेंस मज तें प्यार
सौगंध तयाचा शतहारांहुन थोर !

★

गे तुझ्या नि माझ्या मनीं चांदणें खेळे
' चोरांच्या असतें मनीं ' असें कुणि बोलें.
' पण कुणी कुणाची सांगा केली चोरी ! '
हा प्रश्न निरर्थक...नको सखे वादंग
चौर्यांतच होऊं आपण दोघे दंग !

★

मी मुक्त विहंगम फिरतों नील नभांत
शोधीत हिंडतों...जगास जें अज्ञात.
कुणि म्हणती, ‘ झाला वेडा ! गेला वायां ! ’
हें वेड खरोखर ! जगावेगळें, न्यारें
सौंदर्य शोधणें मनुजा तोषविणारें !

• • •

## पांच कणिका : २९

हा कोण उपटला कवी नवाच सवाई ?
तोंडावर ह्याच्या चरबीची तेजाई.
निष्कांचन कवि मी ... मजला वाटे हेवा;
खुळखुळतीं नाणीं खिशांत ह्याच्या फार
हा 'सिंहछाप-युत' वनस्पती–कविवीर !

★

ये झटका त्याला जनसेवा करण्याचा
तो स्वतंत्र होता कोणत्या न पक्षाचा.
धुमकेतु प्रगटला तेजस्वी ताऱ्यांत !
किति निवडणुकीचें क्षेत्र जाहलें तप्त
अन् ह्याचें झालें हाय डिपॉझिट जप्त !

★

कुणि एक फलाणा आमदार झोकांत
पक्वान्नमदें आला विधीमंडळांत
खुर्चीत टाकुनी देह लागला घोरूं
बिलचर्चा जेव्हां भरास अगदीं येई,
त्या समयीं स्वारी दीर्घ जांभई देई !

★

दिनरात जागुनी एका शिक्षकिणीनें
उत्तीर्ण मुलींना केलें सर्व .... श्रमानें
ये दैनिकांत पण विचित्र वार्ता ऐसी:—
" अभिनंदन करण्या पात्र असे चालिका ! "
हा ! श्रेय कुणाचें ? कुणासि मिळतें फुका !

★

“ मिळविणें स्वराज्यच ... जन्मसिद्ध हा हक्क ! ”
टिळकांची वाणी सफला .... झालों थक्क !
हें सोंग बाधलें, ब्याद नको ही वाटें;
तोतया असें हें ... केली यानें दैना ....
रे सावध, सावध ! सावध फडणिस नाना !

• • •

## थबकलीं पाउलें : ३०

थबकलीं पाउलें इथेंच मनमोहना
सुखविती जिवाला इथल्या नाना खुणा ! ॥ ध्रु० ॥

भेट आपुली पहिली वहिली
या कुंजांतच सहज जाहली
दृष्टादृष्टी नजर लाजली
तूं वेड लाविलें सख्या माझिया मना !

वसंतागमें जैशी फुलली
कळ्यांकळ्यांनीं नवथर वेली
तशीच माझी तनू बहरली
तव स्पर्शें स्नेहल हंसल्या मधुभावना !

आणाशपथा इथें घेतल्या
भावि सुखाच्या गोष्टी वदल्या
कितीक रात्री यांत रंगल्या
सहवासीं तुझिया रमलें किति साजणा !

सखया येथिल जादू न्यारी
ये आकारा स्वप्नें गाहिरीं
मी राधा...तूं कृष्णमुरारी
तूं इथें चोरिलें मन्मन यदुनंदना !

शिवारांत या लपलों छपलों
ही तर कृष्णा जिथें डुंबलों
चिंचेखालीं याच भांडलों
इतिहासीं इथल्या रतली मनकामना !

• • •

## अल्लड बाले ! : ३१

अल्लड बाले ! जीवनांत मम
बिजलीसम तूं चमकत आलिस;
हृदयांतिल प्राकार दिपवुनी
आतुर जीवा ओढ लाविलिस !

यौवनतेच्या उंबरठ्यावर
पाउल तूझें लव अडखळतें
तुझ्या दृष्टिला दृष्टी देतां
मानस तूझें क्षण बावरतें.

मान वेळुनी मजला बघसी
कमलाक्षी तूं गालीं हांसुन
नयनांतिल तव काव्यसुधेचा
अर्थ तुला का पाहुं विचारुन ?

हें तर मोठें कोडें वाटे
कसें विचारूं ? कुठल्या रीतीं ?
अबोल राहुन अधिर जिवाची
वाढविशी गे घोर अशांति !

येशी घरांतुन कितिदां दारीं
चाहुल घेसी मम मार्गावर
तुझ्या कटाक्षीं पोहुन माझें
तुझ्याचसाठीं झुरतें अंतर !

बंधनांत तूं गे हरिणाक्षी
परदृष्टीशर-पाळत चुकवुन

तुला वाटतें ' भेटुन यावें ! '
परन्तु जासी पुरी गोंधळुन

मुग्ध किशोरी ! जीवनांत मम
शकुंतलेसम ये धैर्यानें
प्रणय नको तव प्रीति हवी गे
अढळ राहि जी सातत्यानें !

• • •

## साफल्य : ३२

साफल्य प्रीतिचें आज सखे जाहलें
तूं येतां सदनीं लाख दीप लागले ! ॥ध्रु०॥
नैराश्य-तिमिर मन्मनीं
दाटला; दूर सारुनी
जणुं चमकत आलिस मेघांतुन चंचले !
क्षण उठले भीषण ध्वनी
गडगडत्या जलदांतुनी
त्यांच्यांतुन अंतीं अमृत गे सांडलें !
नजरेंतिल किमया नवी
माझिया मना मोहवी
तव नेत्रकटाक्षें मानस मम बहरलें !
लव दृष्टि तुझी लाजरी
तूं हरितसुमन-वल्लरी
सौगंध जिवाला लोभवितो प्रेमले !
किणकिणतीं तव कंकणें
हें मुकेंच जणुं बोलणें
या संगीतानें वेडच मज लाविलें !
झिरझिरीत पदरांतुनी
पाहसी सखी हांसुनी
लावण्य रतीसम ललितरम्य भासलें !
जें मना हवें वाटलें
सुख तुझ्यासवें भेटलें
या घरास घरपण तुझ्यामुळें लाभलें !

● ● ●

## अहंगंडास : ३३

रे दोन दिसांचें इथलें मानवजिणें
करशील कसें तूं अंबर हें ठेंगणें ?
उन्मत्तपणानें फुगुनि ताठसी व्यर्थ
जरि फुगला बेडुक...बैल कसा तो होणें ?

रे जुन्यापुराण्या तुझिया कवटीमाजीं
भरलेस बटाटे, कांदे, सडकी भाजी
ह्या बुद्धिप्रभावें मिरविसि ज्ञानी म्हणुनी
पण वासरांत तूं गाय लंगडी गाजी !

तूं जाडे जाडे ग्रंथ घेउनी हातीं
ज्ञानाची द्वाही फिरविसि चिमण्या जगतीं
अन् भकसी मूढा ' कर्मवीर तो कोण ? '
' आंबेडकरांची काय मजपुढें महती ! '

ज्ञानाचें घालुन दळण पीठ हो माती
हें शौर्य पाहुनी थरके मंगळमूर्ती;
भयकंपित होउनि सरस्वती बोलली—
" हा कोण उपटला ब्रह्मा नव भारतीं ? "

रे दोन दिसांचें इथलें मानवजिणें
प्रार्थना तुला मम...काकवृत्ति सोडणें;
हो हंसासम तूं सात्त्विक अन् गुण घेई
वाल्याचा बन रे वाल्मिकि सौजन्यानें !

●●●

## कधीं तुझें आगमन : ३४

जीवनांत माझ्या सखे कधीं तुझें आगमन ?
व्याकुळले माझे प्राण वाट पाहुनीया !

नाहीं तुला देखियलें नाहीं तुला पाहियलें
शून्यामधें शोधियलें स्वप्न मोहमाया !

तृषित चातकापरी पहातसें नभान्तरीं
थेंब न ये चोंचीवरी जीव शान्तवाया !

ओतुन शब्दांत भाव आणुन कंठांत जीव
आळविण्या तुझें नांव गायिल्या रुबाया !

दे मजला मन ग्वाही " रे अशान्त शान्त राही
कमलाक्षी सुखदायी येतसे वराया ! "

वायुसंगें तुझा श्वास वहात ये तुझा ध्यास
सत्य गणूं, किंवा भास ? आस मोहराया !

तुझ्या माझ्या निःश्वासाचें मूळ कधीं संपायाचें ?
येई सखे मीलनाचें स्वप्न रंगवाया !

खंत नको, खेद नको आत्मवंचनाहि नको
निःश्वासाचें नांव नको आजला उराया !

लावूं नको सखे काळ पाहूं नको वेळावेळ
ऐस दूर वा जवळ थांबूं नको वायां !

सुखा-दुःखासवें येई येई सखे घाई घाई
जीवनाची प्रीतजुई येई फुलवाया !

• • •

## वसुन्धरे : ३५

वसुन्धरे, तूं अमुची आई
वसुन्धरे, तूं अमुचें जीवन
तुझ्याच आधारानें जगती
प्राणिमात्र हे जीवन घेउन.

कुणी म्हणूं दे तुजला माती
मीहि सांगतों त्यांना 'मा' ती
कुशींत तुझिया धोंडे, मोतीं
तुझींच रूपें अवघीं जगतीं.

जीव, भावना ब्रह्मेशाची
तुझी आकृती तुझीच कांति
असे प्रेरणा वाणी प्रभुची
तुझीच भाषा चाले जगतीं.

बागबगीचे, फुलें, मुलें अन्
कोरिव-लेणीं, महाल, डोंगर
तुझ्याच आधारानें सारें
नाविन्यानें खुलें चराचर

नवे नवे उन्मेष पाहुनी
जातो माझा जीव भारुनी
परमेशाची घेउन वाणी
तुझ्यावरी मी रचितों गाणीं

●●●

## उत्कंठिता : ३६

डाव्या डोळ्याची सारखी फुरफुरते पापणी
हृदयाच्या माझ्या आजला येशिल का घरधनी ? ॥ध्रु०॥

तुझ्या चिंतनीं तनु आसुसली
पाल अचानक अन् चुकचुकली
सोन्याची वाचा मंगला दाविल का सुखखनी !

मिटल्या नयनीं तुझीच प्रातिमा
मिटल्या नयनीं हसे पौर्णिमा
प्रीतिगीत गाई अंबरीं चंद्रासह रोहिणी !

मिटलीं कमलें ये फुलवाया
अनुरागाची प्रभा लुटाया
अंत किती बघसी जिवाला लावुं नको ओढणी !

•••

## मला वाटतें : ३७

मला वाटतें ' भूपत ' व्हावें
(' पोलिस!' छे हो! मी तर मास्तर!)
हवे विनोबा कशास भावे;
' अंतरपालट ' करविन सत्वर!

●

मला वाटतें शाळा सोडुनि
करित बसावें चम्मन गोटा
( उगीच बरं का, याल फसोनी! )
नको शिणविणें नर्मदगोटा!

●

तुरुंगांत मी जावें वाटें
( देशभक्तिची जरी न आशा )
पाठिं लागलीं अमुचीं पोटें
मुक्ततेंत काजळी निराशा!

●

मला वाटतें नशा चढावी
( नव्हे दारुची अधिकाराची )
खुशाल जिव्हा सैल सुटावी
मिळे मान्यता लाचारांची!

●

आमदार मी व्हावें वाटें
( कळणें, वळणें ईश्वर जाणे ! )
तोंड उघडणें जमतें कोठें ?
कार्य आपुलें भत्ता घेणें

•

मला वाटतें पिशाच्च व्हावें
( खरेंच ! ) कुठेंहि संचारावें
' झाड ' गांठुनी ' बिंग ' वदावें
सज्जन-सोंगावरि घसरावें !

• • •

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क. १०७२

## येई सखे ! : ३८

लाविलेंस वेड सखे घेतलेंस करपाशीं
मीलनांत प्रीत कळे हृदयाची हृदयाशीं
नवरस सुमनांचा सुखवाया ये सुगंध
थाटमाट साज तुझा बघतां मी होय धुंद !

सहवासीं येइ तुझ्या कल्पवृक्ष फलाफुलां
अभिलाषा काय धरूं तुझ्याविना व्यर्थ कला
गे असतां मी विपन्न घेतलीस ओढ कशी !
शीतल तो सुखदायी अंबरस्थ मी न शशी !

मोहिलेंस भाळिलेंस प्रणयपांखरा सदां
नेत्रांतिल गे तुझिया जादुगिरी करी फिदा
वितरित ये आनंदा ये हांसत, ये नाचत
झंकारित मधु-वीणा येइ सखे गात गात !

—या जीवन-कलहांत तुझ्यामुळें मी रमतों
गे कविते, गे सरिते ! मी हसतों, हांसवितों !

• • •

## जागृत शंभो ! : ३९

“ मस्तानीचा इश्क हवा अन्
सोडषींतला भाव नवा;
पुष्पांतिल सौगंध हवा अन्
मदनाचा मज काम हवा !

कोड्यांचा मज शोक हवा अन्
नोटांचा पाऊस हवा;
अटिव दुधाचा नको खवा पण—
मुरगीचा मज हवा ‘ रवा ’ !

वेण्यांचा मज नाग हवा अन्
साड्यांची ती मस्त हवा;
वैद्यांचा मज नको दवा पण—
अधरांचा मज स्पर्श हवा !

मदिरेचा मज ग्लास हवा अन्
मदिराक्षीचा नाद हवा;
कुस्तीचा मज छंद नको पण—
मस्तीचा मज अंक हवा ! ”

—छचोरतेनें सडली कविता
नव्या कवींचा जमे थवा
जागृत शंभो, तिसऱ्या नयनीं
बघाच ह्या बेबंद युवां !

• • •

## नव्हतीस जरी तेथें ! : ४०

डोंगरांनीं वेढलेलें गांव तुझें मनोहर
शिव तेथें असो, नसो नांव परी ' शैवपूर '
तुझ्या गांवाजवळून चाललों मी दूरदेशां
नव्हतीस जरी तेथें असावीस हीच आशा !

डोंगरांनीं वेढलेलें तुझ्या गांवा आणि मला
स्पर्श करी सुगंधित वायुलहरींची माला
भारावल्या भावनांनीं केलें मला बंदीवान
नव्हतीस जरी तेथें पाउल गे उचलें न !

डोंगरांनीं वेढलेल्या गांवीं तुझ्या ओढा छान
तुझ्या मनापरी त्याचें स्वच्छ निर्मळ जीवन
मनकाया स्नात झाली आणि सखे माझी प्रीत
नव्हतीस जरी तेथें गाई धुंद मधुगीत !

डोंगरांनीं वेढलेल्या गांवावरील गगन
निळ्या लोचनांची तूझ्या देई मला आठवण
आर्ततेनें केला मोठा तुझ्या नांवाचा उच्चार
नव्हतीस जरी तेथें देती पहाड उत्तर !

वेढणाऱ्या गिरीवर उभे माझे पंचप्राण
शिवालाही शक्य नाहीं त्यांचें करणें दहन
खुळ्या भोळ्या माझ्या मना असा चाललों ठेवून
नव्हतीस जरी तेथें गेलों वाऱ्यास सांगून !

डोंगरांनीं वेढलेल्या गांवीं जेव्हां गे येशील
चराचरांतुनी माझा ध्यास तुला जाणवेल
जिवाशिवाचें नातें मी सखे तुला सांगितलें
नव्हतीस जरी तेथें मनें तुला निरोपिलें !

● ● ●

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 28.7.७९ वि: ...
क्रमांक 1222 नों: दि: ...

# शिलेदार

माझ्या जीवनाचा मीच शिलेदार
माझ्या घोड्यावरी मीच बसे स्वार
झालों मी बेभान, झालों उतावीळ
शिरीं अन्यायाच्या घालावया वार !

माझ्या जीवनाचा मीच शिलेदार
लेखणीस माझ्या भवानीची धार
येऊंदे शाहिस्ता किंवा उदेभान
लोळवीन त्यांना करोनी बेजार !

माझ्या जीवनाचा मीच शिलेदार
मार्गावरी माझ्या मातला अंधार
मानवी जिवाणू येतें चावण्यास
सोडणार नाहीं तरीहि निर्धार !

माझ्या जीवनाचा मीच शिलेदार
एकाकी धांवतों दाटे, फुटे ऊर
मागें खोल दरीं, पुढें उंच गिरी
नाहीं थांबणार पुढेंची जाणार !

माझ्या जीवनाचा मीच शिलेदार
गांठायाचें मला यशाचें शिखर
फत्तरांचा कोट त्वेषें फोडणार
माझ्या जिजाईचा मजला आधार !

• • •

## देवळांतुनी देव निघाला : ४२

देवळांतुनी देव निघाला
दर्शनास मग कां बोलवितां ?
स्वार्थ्यांची ही धर्मशाळ हो
इथें कशाला धूप जाळतां ?

तट्ट फुगोनी घरीं नि दारीं
इथें कशाला उपास करतां ?
सुके न काया तोंड दडवुनी
ओशाळुन कां ढेकर देतां ?

देवळांतुनी देव निघाला
विझल्या ज्योती तिमिर पसरतां—
कर्तृत्वाचे दिवे लावुनी
भुतासारखें कसें नाचतां ?

पायरिशीं अन् चोखा बसलें
भक्ति भावना म्हणते ' विठ्ठल '
धांगडधिंगा कसे घालती
येथें सालोमालो अट्ठल !

देवळांतुनी देव निघाला
निघून गेली ती उज्ज्वलता
भिंति माखुनी शुभ्र चुन्यानें
मूर्खांनो का येइल शुचिता ?

● ● ●

## देवळांतुनी देव निघाला : ४२

देवळांतुनी देव निघाला
दर्शनास मग कां बोलवितां ?
स्वार्थ्यांची ही धर्मशाळ हो
इथें कशाला धूप जाळतां ?

तट्ट फुगोनी घरीं नि दारीं
इथें कशाला उपास करतां ?
सुके न काया तोंड दडवुनी
ओशाळुन कां ढेकर देतां ?

देवळांतुनी देव निघाला
विझल्या ज्योती तिमिर पसरतां—
कर्तृत्वाचे दिवे लावुनी
भुतासारखें कसें नाचतां ?

पायरिशीं अन् चोखा बसलें
भक्ति भावना म्हणते 'विठ्ठल'
धांगडधिंगा कसे घालती
येथें सालोमालो अट्टल !

देवळांतुनी देव निघाला
निघून गेली ती उज्ज्वलता
भिंति माखुनी शुभ्र चुन्यानें
मूर्खांनो का येइल शुचिता ?

●●●

## गर्दभदूत ! : ४३

मधु-चंद्राचें मधुर चांदणें चाखुनिया आला.
परी तयाची आजच गेली सखि मोहराला
कार्तिकांतलें टिपुर चांदणें बघवेना त्याला
विरहामध्यें उष्ण गमें तें जीव खुळा झाला !

वेळ जाइना, झोंप येइना, म्हणून घे धांव
फिसीत होतों जेथें आम्ही ‘ हुकुमाचा डाव ’
मम हातांतिल हिसकुनि पानें बसला खेळाया
एका पानावरीच धजला ‘ हुकूम ’ बोलाया !

सर्दच झालों मर्द पाहुनी.... सरसरलीं पानें
एक्का पडला, राजा रडला तरि त्या शूरानें—
धीर सोडला नाहीं. अंतीं पानच टाकेना
सद्गद झाला, बिलगुनि पानां, संग्रामी राणा.

अर्जुनापरी असेल पडला संभ्रम यालाही
मार्गदर्शना कृष्णापरि मीं केली चपळाई;
“ बायकांत तूं बडबडणारा का उत्तर बाळ !
टाक पान तें, जरि न लाभणें विजयाची माळ. ”

समरामध्यें जैसे घुमती शंखांचे नाद
रस्त्यावरुनी तैसे येती गर्दभ-नवसाद.
“ टाक पान पां ! मूढा ! ” ऐसें वदतां रागानें
बदामराणी टाकुन खालीं रडला शोकानें !

—हांसुनी बोललों तेव्हां
“ गर्दभा जाइ सत्वरीं
दूत हो, आण वाहिनीला
वांचती प्राण ना तरी ! ”

• • •

## धरली पाउलवाट : ४४

धरली पाउलवाट,
आज मीं धरली पाउलवाट ! ॥ ध्रु० ॥

रान मोकळें हवा मोकळी
वरी नभाची नील पोकळी
यांच्यासाठीं हपापलेलें मन माझें मोकाट !

कुणीहि यावें, पदचर व्हावें
स्वयंगतीनें पुढें सरावें
हिला मुळीं नच साहे वाहन जाणारें कैफांत.

नाहींतर ! हमरस्त्यावरतीं
विज्ञानाचीं चक्रें फिरतीं
कशी कुणाची करतिल 'भाजी' न कळे आवेगांत.

धांवपळीच्या मार्गांमार्जीं
'गाझी' मानव करुनी 'हां जी !'
मागें सरतो, डोळे मिटतो, चुकवाया फुंफाट.

परन्तु असली चुळचुळ, धडपड
इथें न चाले कसली गडबड
राव, रंक चालती सुखानें अपुल्याल्या नादांत.

या नादाची गोड खुमारी
घडिभर यावी मदिय अंतरीं
म्हणुनि पाउलें वळलीं इकडे प्रशांतशा रानांत !

• • •

## वियोगघटिका ! : ४५

समीप आली वियोगघटिका
दैव कसें गे कठोर वागे !
ताटातुटिचें दुःख विदारक
दुखवी स्नेहल प्रीती-धागे.

सहन करूं मी कसा शाप हा ?
असा कसा हा घाला आला ?
कसें टाकुं मी पाउल पुढतीं—
सोडुन जीवीच्या जीवाला ?

उपाय नुरला काय करूं मी ?
देह मनाविण पुढेंच जाइल
तुझ्या संगतीं, तुझ्या संगतीं
मानस माझें इथेंच राहिल !

नकोस समजूं प्रेम भंगलें
नकोस समजूं दैवच फिरलें
दैवावरही मात करुनि मी—
करीन जीवन-मीलन अपुलें !

विकास होवो तुझा मैत्रिणी
दोन दिसांचें हें तर वादळ
जीवन-नौका जरि गडबडली
आपण नाहीं दोघे निर्बळ !

विश्वासाचें जिणें पाहिजे
सखये तें तर आहे अपुलें
जरी भरंवसा हाच जिवाला—
पाउल माझें मुळीं न उचलें !

युगें युगें मी वाटच पाहिन
प्रीतिराउळीं दीप तेववित
मंगल घटिका आगमनाची
तुझ्या प्रेमले, बसेन चिंतित !

• • •

## आघात : ४६

ओढून मला मोहांत
केलास उरीं आघात ! ॥ ध्रु० ॥

मी रानपांखरूं बुजरें
चुळबुळलें हृदयीं मधुरे
तव नयनीं पाहुनि मदिरे
तें मादक पाणी गहिरें
मी क्षणांत होय तृषार्त
केलास उरीं आघात !

तव ओठीं बिंबें कुठलीं
रसरसलीं ! लाली फुटली
चोंचीची क्षण खटखटलीं
वर खालीं पातीं थटलीं
अन् क्षुधा रंगली त्यांत
केलास उरीं आघात !

तो लांब-सडक कचभार
विखुरला...होय अनिवार
टाकिलें खुबीनें फार
तूं जाळें गे गुलझार
अडकला फांस पंखांत
केलास उरीं आघात !

करपाश रेशमी आले
झणिं पंख जरा फडफडले
मी दीन पांखरूं इवलें
आधीन, लीन अन् झालें
चमकली वीज देहांत
केलास उरीं आघात !

अन् ढकलुन देसी अंतीं
ही कुठली नीती, रीती ?
धिक्कार करूनी भंवतीं
पांखरें कलकला करतीं
ना गती आधिःक्षेपांत
केलास किती आघात !

• • •

## केली कविता ! : ४७

केली कविता तुझ्यावरी मीं
भावमालिका झाली अक्षर
तुझ्याकडे ती कशी पाठवूं ?
याच विचारें मी चिंतातुर.

प्रणयपुरीचे कुंभ सुधेचे
मीं माझ्या शब्दांत रिचविले
चाखशील का गोडी त्यांची ?
जाणशील का भाव प्रेमले ?

कार्तिकांतलें धुंद चांदणें
मीं माझ्या शब्दांत ओतिलें
प्रभा तयाची शीतल सखये—
गूज कथिल का तुला आपुलें ?

पुष्पांचा सौगंध, रुचिरता
मीं माझ्या शब्दांत आणली
होशिल का बेहोष तयांनीं ?
हीच जिवा हुरहूर लागली !

गंधर्वांचें सुस्वर गायन
गे माझ्या शब्दांत रंगलें
हृदय तुझें नाचेल काय गे—
स्वर्गपरीसम आतुरलेलें ?

—दिव्य अशा शब्दांनीं तुजवर
केली कविता प्रणयी सुंदर
वाचतांच तूं.... होइल का गे—
तुझें नि माझें नातें दृढतर ?

• • •

## कृष्णामाई ! : ४८

दाह जिवाचा होतो जेव्हां गे कृष्णामाई
कविमन माझें शांतीसाठीं तुझ्याकडे येई
काय आपुलें नातें कोणा कळायचें नाहीं
अगाध माया तुझी; कसा मी होइन उतराई ?

तुझिया तीरीं कार्तिकांतल्या पुनवेच्या रातीं
कंजाळावर जाउन बसलों अगदीं एकांतीं
टिपुर चांदणें पहात होतें स्वरूप तव पात्रीं
जैसें कीं एकदां पाहिलें मी रमणीनेत्रीं !

मंद समीरण वहात आला उठल्या जळिं लाटा
लहरत लहरत चमकत गेल्या त्या दोन्ही कांठां
असेंच झालें होतें नर्तन मदंतरीं मागें
विफलित झालें; तरी मला ते प्रिय प्रीतीधागे !

कुठुनी नकळें येइ अचानक केकारव कानीं
पुलकित झाली माझी काया गत रोमांचांनीं
साद घातली जिनें कुठें ती हृदयाची राणी ?
जिचियासाठीं झुरलों, झुरतों विरहभावनांनीं !

दोन्ही तीरांवरतीं शोभा जशि पाचूवाणी
नीरवतेनें मधुन वाहतें अमृतमय पाणी
वादळ मनिंचें इथेंच शमतें तव चरणांपाशीं
गतस्मृतींच्या आठवणींसह रमतों स्वप्नांशीं !

• • •

## अवघड कोडें ! : ४९

तुझ्या मनींचा गोड गोडवा
आणिल का मम हृदीं पाडवा ! ॥ ध्रु० ॥

सौजन्याची मूर्त शालिनी
ओठीं श्रवते अमृतवाणी
लोभस भाषा तुझी रागिणी
ओढ लाविते जिवा !

ईप्सित लपलें गूढ त्वन्मनीं
उसळुनि आलें तुझिया नयनीं
खट्याळ भारी तुझी पापणी
वेड लाविते जिवा !

व्यक्त ठेविसी अव्यक्तांत
लपंडाव कां प्रत्यक्षांत ?
अदय, सदय का असली रीत ?
तात लागते जिवा !

उपचारांचीं देणीं, घेणीं
निरोप, स्वागत यांची श्रेणी
अनुक्त परि गे प्रेय यांतुनी
कंपे मनताजवा !

तुलाच लावूं बोल कशाला ?
मलाहि नडतो अबोल भाला
अवघड कोडें हें सुटण्याला
        मार्ग योजुं का नवा !

मर्म बोलुनी धर्म करूं का ?
आवडेल तुज ? येते शंका
डुलूं लागली अंतर-नौका
        धैर्य-सुकाणू हवा !

• • •

## तूझ्या आगमनीं !  : ५०

होती मीं हृदयांत एक धरिली आशा तुझी मानिनी
होती मी पुजिली दिनानुदिन गे प्रीती तुझी मोहिनी.
चंद्राचेंच जिवास वेड त्रिलगें ध्यासी चकोरा जसें
तेवी चंद्र-मुखी ! मनांत दडलें होतें तुझें गे पिसें !

वर्षें तीं सरलीं, परी न विरली गे भावपूजा मम
वर्षर्तू सरला परन्तु सरिता आटे न ओढ्यासम
प्रीती उज्ज्वल तीच संतत जरी माझ्या मनाभीतरीं
काळें फुंकर घालुनी शमविली गे आस कांहीं तरी.

गेली अक्षरमालिका पुसुनिया रेखा परी राहिल्या
तूझ्या निर्गमनींहि अंतरखुणा गेल्या न प्रक्षाळल्या
होतीं भावफुलें मनीं डंवरलीं... गेलीं सुकोनी पण
निर्माल्यासहि मीं हृदींच धरिलें; तें ब्रीद, माझा पण.

तूझ्या आगमनीं अहा ! बघ कसें निर्माल्यि संजीवन
आर्ताच्या हृदिं केतकीसुरभ ये, सानंद संमीलन !

● ● ●

## मनीषा : ५१

रोज रोज तीच वाट· कुठंवर चालायाची ?
काळजी अन् तीच तीच कुठंवर वहायाची ?
उबगला जीव यांत कधीं नाविन्य दिसेल ?
जीवनांत हवा मला ऊन-पावसाचा खेळ.

अहो माझ्या सुहृदांनो ! तुमच्याच औदार्यानें
खडतर जीवनांत वावरलों आनंदानें
दरींतून गिरीवर चढुनिया आलों जरी
विस्मरण नच व्हावें दृष्टि फिरावी माघारी.

सोबतीस नको कोणी स्वप्नें घेउनिया पण
नदी-तीरीं, डोंगरीं वा जावें वाटें कांहीं क्षण
एकांतींच्या चिंतनांत व्यवहार !–नको नांव
मनसोक्त माझ्या स्वप्नां मिळो माझा सर्व भाव.

रेशमाच्या गांठीपरी सखे, तुझें माझें नातें
माझ्या भावनांचें स्वप्न तुझ्यामध्यें स्थिरावतें.
व्यवहार ओढे मला तुझ्यापासुनिया दूर
तुझा माझा स्नेह राहो कविते गे निरंतर !

• • •

## साथीदार : ५२

भवितव्याच्या भेसुरतेनें
वदनपुष्प तव रंजिस झालें
आर्द्र नयनिं कारुण्य भेटतां
हृदयीं माझ्या गे कालवलें !

काय करावें ? समजेना क्षण
काय वदावें ? समजेना मन
लोचनांस पण बघती लोचन
आत्मियतेचें हो संवेदन.

आत्मियतेचें हो संवेदन
तुला समजलें मला समजलें
समभावांचें मंगलमय तें
नवीन नातें उभयीं आलें !

नवीन नातें उभयीं आलें !
उक्त जरी नच अधरोष्ठांनीं
व्यक्त व्हावया हवी कशाला
मुग्ध जिवाची मधुरा वाणी ?

असेन वदलों चार शब्द मी
तुझ्या हिताचे आपत्कालीं
चार वेद ते समजुन करुणे
मांडलीस पूजाच आगळी !

मांडलीस पूजाच आगळी !
अगे रागिणी मम सौहार्दे
तपस्विनीसम तप आचरितां
होशि यशस्वी हृदय-शारदे !

होशि यशस्वी हृदय-शारदे
'श्रेय तुम्हाला !' कशास मजला ?
निमित्त केवळ...श्रेय नको पण
तव हृदयाचा मात्र भुकेला !

तव हृदयाचा मात्र भुकेला
तव आनंदें मी खुलणारा
हृदयैक्याचें गा तूं गाणें
साथिदार मी सुर देणारा !

● ● ●

## ललाट-रेषा : ५३

परत निघाली सासरला ही
सुवासिनी भाबडी बालिका
उसासून अन् रडे सारखी
व्याकुळ कातर कोमल कलिका !

हृदीं दाटले घन दुःखाचे
राजिव लोचन टिपें गाळितीं
आवरतां नच येत आवरूं
कोण तयांना रोधिल जगतीं !

जमल्या तेथें आयाबाया
ओटिं घातली नारळ, चोळी
भेटुन तिजला वदल्या कोणी
' होशिल लौकर लेकुरवाळी !'

आशिर्वच ऐकतां तियेच्या
हृदयाची पण झाली होळी
ललाटरेषा—चिंतानिं जणुं ती
जळावीण तडफडे मासळी !

समीप येउनि पायां पडुनी
सद्गद वदली ती मज ' जातें !'
समजावोनी मींही म्हटलें
' कधींतरी जावेंच लागतें !'

‘ कधींतरी कां ? आजच जातें ’
बोलुन ऐसें व्यंग्यार्थानें
देत हुंदके गेली निघुनी
अन् ओलीं हो मादिय लोचनें !

“ नवरा कसला ! पुरुष बायकी ! ”
कुजबुज कुठुनी आली कानीं
सुन्न जाहलें मस्तक माझें
अन् डोळ्यांतच आटे पाणी !

• • •

## रडावयाला कोणी नाहीं ! : ५४

एके दिवशीं प्रातःकाळीं
रामफळाच्या झाडाखालीं
मालक-कन्या कडिवर घेउन
आश्रित कोणी ये उल्हासुन.

बोल बोबडे ऐकत असतां
रमुनी गेला त्यांत तत्वतः
बाला बोले घालुनिया गळ
'द्याहो मजला एक रामफळ !'

अशक्त आश्रित बोले तिजला
'मला न ये गे चढावयाला;
पडेन खालीं चढतां वरतीं.'
ऐसें वदतां हिरमुसली ती.

हिरमुसलेंपण पाहुन अंतीं
चढुन जाय तो झाडावरतीं
फळ तोडाया सरतां पुढतीं
तोल जाउनी हो गच्छंती !

फत्तरावरी मस्तक फुटलें
जिकडे तिकडे रक्त सांडलें
किंकाळी फोडतां बालिका
जमल्या तेथें पुरुष, बायका.

कोणीं म्हटलें 'वाइट झालें'
'सज्जन होता' कुणि हळहळलें.
संपे यात्रा ! यात्रिक जाई
रडावयाला कोणी नाहीं ! !

●●●

## रिकामें विडीबंडल ! : ५५

( कै. कवि भा. रा. तांबे यांची क्षमा मागून. )

विडि मागसी माझ्या सख्या परी
विडि बंड्ल रिकामें पडति घरीं ! ॥ ध्रु० ॥

आजवरी तुज फुकटावारी
विडी पुरवुनी ये बेकारी
धूर काढण्या झाली चोरी
ना ससली उरली स्वर्ग-परी !

अतां थोटकें हीं जळलेलीं
रस्त्यावरुनी मीं अणलेलीं
ओढित बसणें आलें भाळीं
घे झुरका आतां कसातरी !

दरबारी वा सिन्नरवाली
बाबा भिकुसाकृत अलबेली
हाय ! कशी रे सोडुन गेली
घे ' सडक छाप ' फर्मास करीं !

सरली रे सरली ती मस्ती
कडक विडीची गेली सुस्ती
' दमा ' वीण ही झुरते छाती
मग ठसका कुठला हाय उरीं !

• • •

## तुफान वारा : ५६

वारा घोंगावत आला वारा घोंगावत गेला
लोट धुळीचा नाचला दिशादिशांत व्यापला
जणूं शिवाचें तांडव वाटें सुरुं झालें येथ
स्थिरचर हादरून झालें पुरें भयभीत !

झाडें कडाडलीं सारीं घरें धडाडलीं साचीं
झाली तेथील जिवांच्या वाताहत जीवनाची
वारा तुफान बेभान कसा घालतो थैमान ?
निराधार जीवनांची उडालीसे दाणादाण !

" देवा ! थांबवा हा वारा... आणि संकट निवारा ! "
कुणी अज्ञान पामर घाली सांकडें ईश्वरा.
काय थांबेल पामरा असा सोसाट्याचा वारा ?
कसा कोठून जन्मतो प्रश्न तापदां विचारा.

डोक्यावर येऊनिया सोडी किरण-निखारा
आणि जुलमी तापानें कां न खवळेल वारा ?
घोंगावत आला वारा घोंगावत गेला वारा
तापें तापतां ही धरा पुनः वळेल माघारा !

• • •

## चैत्रपालवी : ५७

ओबडधोबड पाउलवाट
धुळीधुळीनें धुळकटलेली
ऐन दुपारीं दोन पावलें
व्याकुळतेनें पहा चाललीं !

डोईवरतीं रणरणतें उन
पायांखालीं पेटें इंधन
रंध्रारंध्रांतून पाझरें
घाम, उकळतें साक्षात् जीवन.

आणि तशांताचि पिसाट वारा
ज्वालामुखिंचा जणूं फवारा
नाकीं तोंडीं सर्वांगांवर
त्याच धुळीचा करतो मारा.

दोन पावलें तशिंच चाललीं
मरणामधुनी जगण्यासाठीं
धडपड, तगमग पतनांतूनहि
अमर्त्य आशा चाले पुढतीं !

तोंच वर्षलें जीवन वरतुन
त्याच धुळींतुन सुगन्ध आला
चैतन्यानें जणूं तयांच्या—
चैत्रपालवी फुटे जिण्याला.

• • •

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
अनुक्रम ............ दि: ............
क्रमांक ............ नों: दि: ............

# यावा तो दिन!

तो दिन यावा... तो दिन यावा
मनामनांचा संगम व्हावा
मन्मन म्हणतें ‘ येइल, येईल ’
घेतों आशेचा मागोवा.

निबिड तमांतुन वाट चालतों
दिसे न जरि ती... पडतों, उठतों;
गिरी, दरी वा हिंस्र श्वापदें
पथीं भेटतां चुकवुन जातों.

किती मोडले कंटक पायीं
तसूतसूवर झाले दंशहि
कधिं न थांबलों बिचकुन कोठें
पुढचें पाउल पुढेंच जाई.

विटतों जंव मी अलिप्त होतों
दुर्जन.... दुर्धर रोग वाटतो
अलिप्तपेचें भूत लागतां
अलिप्ततेला हुसकुन देतों.

जातों जंव मी जनसंमर्दीं
मला धेरिते दूषित गर्दी
जिवंत मृत्यू बघुनी वाटें
हवी पळाया घोडी जर्दी.

अलिप्तता अन् मिसळुन जाणें
असें सारखें घडें क्रमानें
उपेक्षिताचें शापित जीवन
कळें न मजला कधीं संपणें.

तरि न थांबतें उरिंचें गायन
" यावा तो दिन ! यावा तो दिन ! "
दृढनिश्चयी जो, अढळपदीं तो
ध्रुवबाळाचें मद्‌हृदिं गायन !

• • •

## पेटीवरचीं तीन माकडें : ५९

आगपेटिच्या वर बसलेलीं
तीन माकडें अबोलतेनें
ज्वालाग्राही जणुं गिरिवरुनी
बोलत बसलीं मौनपणानें !

एक तयांतिल मुस्कटदाबी—
स्वतःच घेतें करुनि आपुली;
डोळ्यांमधुनी दावित बसलें
खळबळ तगमग हृदयामधली !

दुजें तयांतिल कानांवरतीं
हात ठेवुनी मुकाट बसलें
आजवरीच्या वार्ता ऐकुन
सुचवी जणुं कीं 'कानच किटले !'

अन् तिसरें तें झाकुन डोळे
भीतीनें थरथरूं लागलें
आजवरीच्या घटना बघुनी
सुचवी जणुं कीं 'डोळे गेले !'

आगपेटिच्या यज्ञावरतीं
ज्वालाग्राही सरणावरतीं
बघणें, श्रवणें आणि ऐकणें
सर्व क्रिया ह्या खंडित होती !

—तेव्हां होतों असेंच आम्ही
पेटीवरचीं तीन माकडें
अन् आतांही असेच आम्ही
पेटीवरचीं तीन माकडें !

● ● ●

## अभंग : ६०

फत्तरींहि देवा मानिलें अंतर
तूं गा विश्वंभर म्हणोनीया;

फुटलें कपाळ घेतां साक्षात्कार
फुटे न पाझर तुला देवा !

मर्त्य आम्हि जन दुर्बल पामर
मायेची पांखर अंतरे कां ?

सोसवेना हाल जहालों जर्जर
कां न गहिंवर तुला येई ?

रंजलें गांजलें यांचा पाठिराखा
भलत्यांचा सखा कसा होसी ?

'सद्गुरूवांचोनी सांपडेना सोय !'
त्यांनीं हातपाय लुले केले !

क्षणोक्षणीं तुटे तिळतिळ जीव
कुणाकडे धांव घ्यावी आतां ?

गरीब जिवांची उडे दाणादाण
होय धुळधाण संसाराची !

कलियुगीं देवा कां गा थंडगार
बनलों लाचार कृपावंता !

• • •

## एक मडकें ! : ६१

मी एक मडकें आहे;
आहे मी एक मडकें.
मडकें म्हणा... गाडगें म्हणा,
घागर म्हणा... रांजण म्हणा,
लोटकें म्हणा... बोळकें म्हणा;
मी एक मडकें आहे !

★

मातीपासून मडकें बनतें;
मडकें फुटुनी माती होते.
मातीपासून पुनः मडकीं;
मडकीं फुटतां पुनः माती.
असें सदांचें रहाटगाडगें
खंड न त्याला... अंत न त्याला
( चक्र सारखें फिरावयाचें )
फुटावयाचें, बनावयाचें
रहाटगाडगें, रहाटगाडगें
त्यांतीलच आहे मी
एक गाडगें... एक मडकें !

★

मडकें आहे मडक्यासाठीं
रांजणासाठीं, घागरीसाठीं
लोटक्यासाठीं, बोळक्यासाठीं

छोटे मोठे परस्परास्तव
रहाटगाडगें आहे वास्तव
मडकें आहे मडक्यासाठीं
पण नाहीं तें—
केवळ मडक्यासाठीं !

*

केवळ नच तें मडक्यासाठीं
मडकें आहे पाण्यासाठीं
तृषितांना शमवाया.
मडकें आहे भुकेलेल्यासाठीं,
अनाथ अपंगासाठीं,
किडुक मिडुक दूधदुभत्यासाठीं
मडकें नाहीं... केवळ मडक्यासाठीं.

कांहींतरी भलें पाहिजे त्यांत
जें स्वतःसाठीं...दुसऱ्यासाठींहि;
कोरें करकरीत.... ठणठणीत
हवेशिवाय ज्यांत न कांहीं
मडकें !....
केवळ तें मडकें !

*

कच्चें मडकें... अर्धवट मडकें
नामदेवाच्या कच्च्या घटासम
अहंतेनें ताठरलेलें... निरूपयोगी.
त्याच्याही... पराच्याही.

संस्कार हवेत त्यावर
गोरा कुंभाराच्या
अनुभव-गुरूच्या ' थापटण्याचे ' !
कच्च्यांत काय रहाणार आहे ?
त्याच्यासाठीं वा परासाठीं ?
कच्चें मडकें बदबदणारें बाद आहे;
पक्कें मडकें खणखणणारें
कांहींतरी नाद आहे—
असें एक मी मडकें आहे !

*

जगाच्या आरंभापासून मडकें आहे,
जगाच्या अंतापर्यन्त रहाणार आहे.
जन्मापूर्वी मडकें आहे !
मृत्यूनंतर मडकें आहे !
मडकें कुणा चुकत नाहीं
मडक्याला कुणी चुकत नाहीं
आपलें मडकें हवें आपल्या मानेवर
लादूं नये मडकें मडक्यावर.
द्यावें, घ्यावें समजूत, उमजूत
भल्याला सामावणारें
इद्याला हकलणारें
मी एक मडकें आहे !
बनलेलें, फुटणारें
पुनः फुटणारें...पुनः बनणारें
फुटून, फुटून बनणारें
आहे मी एक मडकें
मी एक मडकें आहे !

• • •

## घना कृपाळा ! : ६२

अशी अचानक केली कैसी तुम्हीं वाकडी वाट ! ।।ध्रु०।।
वसंतांतलें वैभवलेणें
विशीर्ण केलें या शिशिरानें
वावटळीनें पर्णसुमांची झाली वाताहात !

तुमच्यासाठीं पुष्पें फुललीं
वाट पाहुनी दमलीं सुकलीं
घमघमाट अन् सौगंधाचा विरला अवकाशांत !

अस्थिपंजरा झाली काया
कसें पांखरूं येइल वाया ?
भकास माळावरी सोबती एकुलता एकान्त !

' शितें... तोंवरी भुतें भोंवतीं '
आळविली नच करुणा-गीती
तेवढीहि नच उरली शक्ती दुर्मुखल्या वदनांत !

वर्षाकालीं आस धरावी
सभोंवतीं पण वृष्टी व्हावी
इथें मुळीं नच पाउल वळलें अपुलें किति सालांत !

—आणि आजला घना कृपाळा
माझ्यावर शिडकावा केला
परी कृपेचें झालें ओझें हाय ! घडो देहान्त !

● ● ●

## मार गिन्ना ! : ६३

: १ :

कच्च खाणें हा तुझा न बाणा
मार गिन्ना ! मार गिन्ना ! मार गिन्ना !
जनता म्हणजे काय खरोखर ?
( बहुत मेंढरें... कांहीं धनगर ! )
'जनता, जनता !' करित घोषणा
( वेंच न त्याला... खर्च न त्याला ! )
म्हण मेंढ्यांना अन् मेंढींना—
"देइन चारा... चरा कुठेंही,
देइन पाणी... कुठेंहि घोटा.
मिळेल मुबलक चारापाणी...
लेंड्या टाका माझ्या रानीं;
होइल सगळी आबादानी !"
धनगर आणिक धनगरणींना...
म्हणा रावजी घोळुन त्यांना:——
"देइन तुम्हां पुष्कळ 'वाडे'
धनधान्यांनीं भरतिल वाडे !
वाजतील तुमचेच चौघडे !"
—जा मग वरतीं खालिं न बघण्या
वेळच पडली, देत दुगाण्या...
सदैव म्हणणें 'बघतों, बघतों !'
चरत बैसणें...बघणें अन्ना !
जनता म्हणतां, 'आण्णा, आण्णा !'

निस्पृहतेनें म्हणणें ‘ नन्ना ’ !
चल मार गिन्नाऽ
मार गिन्ना ! मार गिन्ना ! मार गिन्ना !

●

: २ :

‘ चलो दिल्लि ! ’ तर चलोच गल्लीं !
दिल्ली आहे बहूत दूर...
देशभाक्तिचा गल्लित धूर !
लफडीं तिफडीं शोधित बसणें,
न्यायनीतिचा चिवडा करणें !
माकड न्यायाधीश होउनी
लोणी सगळें ‘ स्वाहा ’ करणें !
जमवुन कांहीं गाळिव वल्ली
रात्रि फिरावें गल्लोगल्लीं !
( नडतें कोठें ? असलि न किल्ली ! )
नसत्यावरती घ्यावा आळ
आपण व्हावें कर्दन-काळ !
आणि म्हणावें, ‘ पाटिल, पाटिल ! ’
( लिहील जो तो बोटें चाटिल ! )
‘ नोंद ’ रेटणें जमेल तितकी,
‘ बांध ’ रेटणें जमेल तितका.
आणि रेटणें कोर्टीं भोळीं...
‘ भाउसायब्री ’ दावुन इंगा !
घाल कसाही धाब्रडधिंगा !
—खिडिंत गांठुन घ्यावि खंडणी
खिसे भरावे दोन्हींकडुनी !

उजेडांत पण साव दिसावें...
'वाइट झालें ! कली !' म्हणावें !
"व्हा जागे व्हा...अन्यायाला—
पाठवुं या कीं यमसदनाला !"
फक्त करावी अशी घोषणा !
चल मार गिन्ना ऽ
मार गिन्ना ! मार गिन्ना ! मार गिन्ना !

*

: ३ :

जोंवरि संधी...तोंवरि चंदी...
अशाच वेळीं व्हावें नंदी !
'चान्सा'साठीं नृत्य करावें
( लाथ लागुं दे कुणा कशीही )
काय टाप मग गर्दभजीची !
तार न त्याची चालायाची.
वशिला, वशिला, वशिला, वशिला
जर्दी घोडी बनविल 'म्हशिला'
बनविल घोंडा साक्षात् शशिला...
नसेल जर का वशिला अशिला !
कांहीं नसुं दे कवटीमाजीं
ताल धरावा नामी 'जी जी' !
होशिल यानें बाजी गाजी.
असु सत्वानें 'दुसरा बाजी'....
बनविल वशिला 'पहिला बाजी' !
ताल धरी परि नामी 'जी जी.'

उपकर्त्यांच्या घरिं भर पाणी
आण परांच्या नयना पाणी !
म्हण भोळ्यांना, ‘ देइन चिकटुन ’
घ्यावा पैसा अगदीं निपटुन !
होशिल चिटणिस...होशिल पंच
( नसुंदे नसला मुळींहि पोंच ! )
–घे कंत्राटें...कर अफराटें
छोटे मोठे योजुन फाटे;
चवलीवारी अन् मजुरांचें—
( शाब्बास फंची ! ) रे उर फाटें !
वा रे भाऊ ! वा रे नाना !
वा रे तात्या ! वा रे आण्णा !
चल मार गिन्नाऽ
मार गिन्ना ! मार गिन्ना ! मार गिन्ना !

★

: ४ :

‘ शेत्करि राजा ! धर्मी राजा ! ’
—पाड तयांचा कसाहि फन्ना !
‘ नांगरयोगी ! नांगरयोगी ! ’
—वा रे पठ्या हो तूं भोगी !
‘ छळती त्याला तीनहि काळ ! ’
—हो तूं चौथा अन् वेताळ !
घे तूं कापुस डोंगरमोठा;
—लंगोटीचा दामच खोटा !
कर मालाचा कसाहि सट्टा;
—लंगोटीचा आंतच बट्टा !

' अडत, हमाली, धर्म, दलाली...'
—बन तूं धार्मिक सभ्य मवाली !
भजी ' गिन्निला ' दे तूं चार
—डाळ पायली...'रुपया ' फार !
राजा बसला चिवडित माती;
—हाण फाकड्या माणिक, मोतीं !
राजा धरतो ' नांगर-मिठ्ठा '...
—' रगड 'माल तूं खमंग ' मीठा ' !
कष्ट घेइ तूं कितिक हजार...
—शंभर देतां हो बेजार !
' आणि बैल ते...कष्ट तयांचे ? '
( शुद्ध जनावर गणावयाचें ? )
' तावडींत अन घरी चावडी ! !....'
( जवळ नाहिं का जुनी बावडी ? )
करित बसावी वादावादी
फलित नसावी गोष्टहि साधी !
अमकावादी...तमका वाद...
वादें वादें अंतीं पाद !
उगीच रडावें आणुन करुणा...
" धर्मी राजा, काय र दैना !
धर्मी राजा, काय र दैना ! ! "
चल मार गिन्ना ऽ
मार गिन्ना ! मार गिन्ना ! मार गिन्ना !

● ● ●

## अज्ञाताच्या गूढ तमांत! : ६४

दूर दूर तूं...दूर दूर मी
अज्ञाताच्या गूढ तमांत
आणि तयांतच हिंडुन हिंडुन
मन्मन सखये झालें क्लान्त !

वेध ध्यायचा कोठें कोठें...
आणि चौकशी करावयाची ?
विचित्र तेंही...श्रेय कोणतें ?
पुरीच फजिती भाळिं यायची !

ताटातुटिनें वाढे हुरहुर
झेंपावत हें माझें अंतर
झेंप कुठें पण ? ओढ कुणिकडे ?
सरली धरती, सागर, अंबर !

तरि न थांबली लवहि भ्रमंती
क्लान्त जरी मी...पाउल पुढतीं;
तव ध्यासाचा दास होउनी
प्रवास चाले नच विश्रान्ति !

आठवती त्या आणाशपथा
मधुओठीं ज्या मधाळलेल्या
आठवती त्या मधु गुजगोष्टी
चांदरातिला ज्या खुललेल्या !

आठवते ती खट्याळ गोडी.
नयनांमधुनी स्मित करणारी;
आठवते ती सूचक भाषा
हृदया माझ्या मोहाविणारी !

—आणि वाटतें या अंधारीं
चमकुन जाइल विद्युल्लतिका
सांपडेल पथ; आणिक, आणिक—
तूंहि...प्रीतिची सुगंधि कलिका !

• • •

## नाटक : ६५

संपें नाटक आणि नाट्य सरलें पात्रेंहि जातीं दुरीं
खालीं ये पडदा जवेंच वरुनी तत्काळ भूमीवरी
तेजःपुंज दिवे तदां झटझटा गेले विझोनी पुरे
जाती प्रेक्षक रंगभूमि त्यजुनी—अंधार तेथें उरे.

नाट्यांतील तशीच तीच कशि यावी रम्यता जीवनीं ?
काव्यांतील तशीच मूर्त न सुधा, सौंदर्य संजीवनी
सत्याभास तिथें खराच गमतो रंगून जातें मन
सत्याच्या जगतीं पुनः उतरतां ओलावती लोचन !

झालें आज तसेंच गे जंव करीं येई तुझी ‘ पत्रिका ’
जी मीं गुंफियली तुझ्यास्तव सखे ती भंगली मालिका
शोका कोंडियलें तसेंच हृदिं मीं आल्या जरी वेदना—
येतां मंगलता तुझ्या मनिं सखे ! हेलावल्या भावना !

खालीं ये पडदा जवें मखमली गे संपलें नाटक
जासी रंगपटांत तूं निघुनिया मी राहिलों प्रेक्षक !

• • •

## चांदणें ! : ६६

टिपुर चांदणें, टिपुर चांदणें पिठासारखें पडें
स्वर्गामधल्या सुधारसाचे नकळत फुटले घडे
होई शिंपण धरणीवरतीं स्थिरचर मोदें खुलें
मंद समीरण सुस्वर गातां, तरुगण सारा डुले.

सुधाकराचें मोहक हंसणें आलें कीं वरतुन ?
त्या हास्याचीं खालीं झाली चहूंकडे पखरण ?
चंद्र-रोहिणी प्रेमरसाची किंवा ही किमया...
भूल पाडण्या मोहक नाजुक आली या समया ?

कुबेर झाला उदार किंवा धवल धना उधळितो ?
क्षीरसागरा भरती येउन धरती तो व्यापितो ?
मदालसा, मेनका, उर्वशी रंभांचें यौवन...
अणुरेणूंतुन नीरवतेनें रम्य करी नर्तन ?

जरतारी या स्वप्नभूमिचा मुशाफीर मी खरा
मम काव्याचा चांदण्यांतुनी हंसत निघतो झरा !

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 28963 विः ..
क्रमांक ...... नोंः दिः ..

## कैलास : ६७

मला तो आवडतो कैलास !
पुनः पुन्हा पाहिला तरीही तृप्त न झाली आस ॥ ध्रु० ॥

लांबुन दिसतो उजाड डोंगर
हृदयिं तयाच्या पार्वति–मंदिर
स्वर्गच गमतो आला भू-वर
गिरिजेसाठीं गिरी–पित्यानें हृदयिं निर्मिलें त्यास ?

किंवा शंकर तो प्रलयंकर
संपवुनी जगतांतिल संगर
थांबतसे का येथें क्षणभर
गिरिजेवरच्या प्रेमाखातर करावया सहवास ?

शिल्पें येथिल नयनमनोहर
मना पाडिती भूल खरोखर
जरी शिवानें तृतिय नेत्रशर—
सोडियले...तरि अमर राहिला सुंदरता–उल्हास !

युगायुगांच्या आघातांनीं
शिल्पकृती त्या गेल्या फुटुनी
अवशेषांचीं रूपें पाहुनि—
अनामिकांच्या श्रेष्ठ कलांची अनुभूती ये खास !

जीवनद्वेषी, जीवनप्रेमी !
चला एकदां नवीन व्योमीं
कैलासाच्या अंतर्यामीं
जगण्यावरची श्रद्धा घेउन खचितच याल गृहांस !

वेड मला परि....तिथें रहावें
शांतिसुखीं सौंदर्य पुजावें
पूजन होतां गात फिरावें—
सत्–चित्–आनंदाचें गाणें जगता सुखवायास !

• • •

## माझी वेल : ६८

फुलारलेली माझी वेल ! ॥ ध्रु० ॥

लावण्याची जणुं ही तनया
यौवनभारें लवली विनया
सदां हरित ही अनुपम काया
दृष्ट न हिज लागेल !

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणें दा. क्र. १००८२

कळ्याकळ्यांतुन जीवन फुललें
जग भंवतीचें गंधित झालें
चोर-पाउलीं पवनच येतां
हितगुज रम्य खुलेल !

शिशिरऋतूची हिला न बाधा
तापद ग्रीष्में उडे न त्रेधा
पुष्पयुता ही चिरसंपन्ना
खंड न यांत पडेल !

रसिकांनो या तुमच्यासाठीं
फुलवियली मी ही समसृष्टि
असाल कष्टी...तरिहि सुमांनीं
तुष्टि तुम्हां लाभेल !

प्रभुचरणीं वा अन्य कुणाला
खूष कराया...अर्पायाला
तोडा कितिही निःसंकोचें
धन्यताच वाढेल !

हीनपणानें चुरगळुनी वा
टाका, फेंका मला न हेवा
मम हृदयांतिल संजीवनिनें
देठ देठ बहरेल !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम २४१९३ दि: ०१।०५

REFBK-0010092
REFBK-0010092